

# शेतीमधील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा हिंसाचार

## महाराष्ट्रात केलेल्या अभ्यासाचा अहवाल

सोपेकॉम | जुलै २०२४

**शेतीमधील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा हिंसाचार**
महाराष्ट्रात केलेल्या अभ्यासाचा अहवाल

**अहवालाचे लेखन :** सीमा कुलकर्णी, स्नेहा भट, ऋचा वसुमती सतीश, वनिता तुमसरे
**सर्वे विश्लेषण सहाय्य :** डॉ दीपा पंडित
**अभ्यासामध्ये सहभाग :** महिला किसान अधिकार मंच (मकाम)
**अहवालाची मांडणी :** राजेंद्र देशपांडे
**छायाचित्रे :** विद्या कुलकर्णी

**सोपेकॉम**
१६, काळे पार्क सोमेश्वरवाडी रोड, पाषाण, पुणे ४११००८.
gender.soppecom@gmail.com
www.soppecom.org

# शेतीमधील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा हिंसाचार

## महाराष्ट्रात केलेल्या अभ्यासाचा अहवाल

सोपेकॉम | जुलै २०२४

# ऋणनिर्देश

ह्या अभ्यासात सहभागी झालेल्या सुमारे १५०० शेतकरी आणी शेतमजूर महिलांनी अभ्यासात सहभाग घेतला, त्यांचा वेळ त्यासाठी दिला आणि त्यांचे अनुभव आम्हाला सांगितले त्यासाठी त्यांचे आभार. त्याशिवाय गावपातळीवर ज्या सर्व लोकांकडून आम्ही अभ्यासासाठी माहिती घेतली त्या आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचारी, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी, ह्यांनी जी माहिती दिली त्यासाठी त्यांचे आभार

मकाम नेटवर्कशी जोडलेल्या सर्व महिला शेतकरी आणि इतर सदस्य ह्यांनी वेलोवेलो जे सह्हाय केले आहे त्याशिवाय हा अभ्यास पूर्ण होऊ शकला नसता. मागील दहा वर्षांमध्ये ह्या सर्वांच्या बरोबर होत असलेल्या चर्चेचे ह्या अभ्यासाच्या आखणीमध्ये महत्त्वाचे योगदान आहे. अभ्यास ज्या क्षेत्रात करण्यात आला त्या भागातील मकामच्या प्रतिनिधींचा विशेष उल्लेख करावा लागेल. अकोला जिल्ह्यात काम करणाऱ्या प्रकृती संस्थेमधील सुवर्णा दामले, शालिनी वानखडे, आणि उपेंद्र गावंडे, यवतमाळ जिल्ह्यातील प्रेरणा ग्राम विकास संस्थेच्या माधुरी खडसे, आणि परभणी जिल्ह्यातील राजलक्ष्मी प्रतिष्ठान संस्थेचे राजू केंढे ह्यांनी ह्या अभ्यासात जे योगदान दिले त्यासाठी त्यांचे विशेष आभार.

वेवेगळ्या सरकारी कार्यालयातील – भरोसा सेल, स्पेशल सेल, सखी सेंटर – अभ्यासासाठी जे सहकार्य केले त्यांचेही आभार.

विद्या कुलकर्णी ह्यांनी त्यांच्या छायाचित्रांमधून महिला शेतकऱ्यांचे वास्तव उत्कृष्टरित्या टिपले ह्यासाठी त्यांचे आभार.

हा अभ्यास महाराष्ट्राच्या बरोबरीने तेलंगणा आणि पंजाब ह्या दोन राज्यांमध्ये देखील करण्यात आला. आमच्या ह्या प्रवासात आमच्या बरोबर असणारे तेथील आमच्या सहकारी, तसेच ह्या अभ्यासात वेळोवेळी आम्हांला ज्यांनी मार्गदर्शन केले ते मार्गदर्शक – सुनिता धर, सुमी कृष्णा, नवशरण सिंग, ए आर वासवी, व्ही वामसी, आणि पुरेन्द्र प्रसाद ह्यांचे आभार.

हा सर्व उपक्रम सोपेकॉममधील आमच्या सहकाऱ्यांच्या मदतीशिवाय पर पडू शकलाच नसता. त्यामुळे त्यांचे विशेष आभार.

सीमा कुलकर्णी, स्नेहा भट, ऋचा वसुमती सतीश, आणि वनिता तुमसरे

जुलै २०२४



प्रस्तावना / 1
भाग २ : सर्वेमधील महिला कोण होत्या? / 11
भाग ३ : ग्रामीण महिलांची उपजीविका / 19
भाग ४ : ग्रामीण महिलांचे स्वास्थ्य / 35
भाग ५ : गोषवारा आणि पुढील दिशा / 43
कोष्टक आणि तक्त्यांची यादी / 50



# प्रस्तावना

महाराष्ट्रात शेती क्षेत्रात विरोधाभासाची परिस्थिती आहे. राज्याच्या उत्पन्नापैकी शेतीमधून येणारे उत्पन्न केवळ १२% असले तरी एकूण लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे (सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण 2022-23). राज्यातील शेती क्षेत्रासमोरची आव्हाने पाहता शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांची ही आकडेवारी विशेष महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातील ९० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या कोरडवाहू प्रदेशात राहते. राज्याच्या एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी ८३ टक्के क्षेत्र कोरडवाहू असून (कृषी गणना २०१५-१६), महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे कोरडवाहू राज्य आहे. देशातील सर्वाधिक मोठी धरणे महाराष्ट्रात असूनही २० टक्क्यांपेक्षाही कमी क्षेत्र सिंचित आहे. राज्यामध्ये सरकारी सहाय्य हे सिंचित प्रदेशामध्ये केंद्रित झाले असून, कोरडवाहू प्रदेश दुर्लक्षित राहिले आहेत.

कोरडवाहू प्रदेशात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे आणि सक्तीचे स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ हे त्याचेच परिणाम आहेत. १९९५ ते २०२२ ह्या काळात जवळपास ९६,००० शेतकरी आत्महत्या झाल्या असून, त्यामधील ९.७ टक्के आत्महत्या महिलांच्या होत्या (National Crimes Record Bureau of India). ह्या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मागे राहिलेल्या विधवा महिलांवर शेती आणि कुटुंबाची सर्व जबाबदारी येऊन पडते. 'विदर्भ पॅकेज' सारख्या उपाययोजना ह्या संकटाचा सामना करण्यामध्ये अयशस्वी ठरल्या आहेत.

शेती आणि सिंचनामधील सुधारणा प्रकल्पांमुळे ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांवरील भर अधिक वाढला आहे. राज्याच्या एकूण लागवडी खालील क्षेत्रापैकी केवळ चार ते सहा टक्के क्षेत्र असून देखील एकूण सिंचनाला दिल्या जाणाऱ्या पाण्यापैकी ६० टक्के पाणी हे ऊसाच्या पीकासाठी दिले जाते. पीक पद्धतीमध्ये झालेल्या ह्या बदलामुळे शेती, बाजार आणि

हमीभावासंबंधी धोरणे बदलली. ह्या धोरणांमध्ये अधिक शाश्वत आणि त्या भागासाठी सुसंगत असणाऱ्या पिकांऐवजी पाणी अधिक वापरणाऱ्या पिकांना प्रोत्साहन दिले जाते. उदाहरणार्थ ऊसाच्या पिकाखालील क्षेत्र १९६०-६१ पासून ४.३ टक्क्यांनी वाढले आहे.

कोरडवाहू प्रदेशामध्ये सोयाबीन सारख्या पीकाला प्रोत्साहन दिल्यामुळे शेतीच्या पद्धतींमध्ये बदल होत गेले आहेत. १९६०-६१ मध्ये सोयाबीनचे पीक राज्यात घेतले जात नव्हते. २०१५-१६ मध्ये तेलबियांखालील क्षेत्रापैकी ९१ टक्के क्षेत्र हे सोयाबीन खाली आले आहे (कृषी गणना २०१५-१६). जेथे सोयाबीन पिकवले जाते तेथे तेलासाठी त्याचा उपयोग केला जात नसला तरी त्याची विक्री मात्र मोठ्या प्रमाणात केली जाते. थोडक्यात अन्नधान्याच्या पिकांखालील क्षेत्र कमी झाले आहे. कोरडवाहू प्रदेशातील कापसाखालील क्षेत्र ०.८ टक्क्यांनी वाढलेले असले तरी कापसाच्या पारंपारिक स्थानिक वाणाची जागा बीटी कॉटन ने घेतली आहे. ह्या कापसावर येणाऱ्या किडीचे प्रमाण अधिक असल्याने उत्पादनाचा खर्चही वाढतो आणि पर्यावरणाची हानीही होते.

अन्न आणि इतर आवश्यक संसाधनांसाठी बाजारावर अवलंबून असणे आणि पर्यावरणाचा वाढता ऱ्हास ह्यामुळे जगण्यासाठीचा संघर्षही वाढला आहे. विशेषतः वंचित समुदायांसाठी. ह्या समाजातील महिला पुरुषांना पाणी आणि जळण आणण्यासाठी खूप वेळ द्यावा लागतो, ज्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरही होत असतो.

१९६० मध्ये राज्याची स्थापना झाल्यापासून महाराष्ट्र राज्यात औद्योगिक विकास आणि सिंचन केंद्रिय धोरणांमुळे कोरडवाहू शेतीकडे पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. १९७२-७३ च्या दुष्काळानंतर ह्याकडे लक्ष वेधले गेले असले तरी उपाययोजनांचा भर हा सिंचन संरचना उभ्या करण्यावर राहिल्याने त्याचा फायदा हा काही प्रदेश, ऊसासारखी काही पीके, आणि काही गटातील शेतकरी ह्यांना झाला.

मागील काही दशकांमध्ये राज्यातील शेती व्यवस्था आणि जमिनीच्या वापरामध्ये मोठे बदल झाले आहेत. शेतीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात बिगर शेतीकडे वळवले जात आहे. विशेषतः शहरांच्या आजूबाजूच्या परिसरात. १९६१ ते २०२२ ह्या काळात १० लाख हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र हे शेतीसाठी अनुपलब्ध म्हणून वर्ग करण्यात आले आहे, आणि एकूण लागवडीखालील क्षेत्रामध्ये दहा लाख हेक्टर पेक्षा अधिक घट झाली आहे ह्यामुळे राज्यातील अन्नधान्य उत्पादन वर्षाला १३ लाख टनाने कमी झाले आहे (देशपांडे आणि इतर २०२२).

शेतीखालील क्षेत्रामध्ये घट मोठ्या प्रमाणात झाली असली तरी शेतीवर अवलंबून असणाऱ्या कामगारांची संख्या मात्र त्या तुलनेत कमी झालेली नाही. राज्याच्या अर्थव्यवस्थेमधील शेतीचे घटते योगदान आणि शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या ह्यांचे प्रमाण विषम असल्याने पिकाखालील क्षेत्रापैकी प्रति हेक्टरवरील भार वाढलेला आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भामध्ये.

शेतीखालील क्षेत्रामध्ये घट मोठ्या प्रमाणात झाली असली तरी शेतीवर अवलंबून असणाऱ्या कामगारांची संख्या मात्र त्या तुलनेत कमी झालेली नाही. राज्याच्या अर्थव्यवस्थेमधील शेतीचे घटते योगदान आणि शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या ह्यांचे प्रमाण विषम असल्याने पिकाखालील क्षेत्रापैकी प्रति हेक्टरवरील भार वाढलेला आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भामध्ये.

९० च्या दशकात महाराष्ट्रात अवलंबलेली आर्थिक आणि विकासाच्या धोरणांचे महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रावर आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांवर गंभीर परिणाम झाले आहेत. शेतकरी आत्महत्या, सक्तीचे स्थलांतर, महिलांवरील कामाचे वाढते ओझे, आणि मराठा आरक्षणासारखी आंदोलने अशा विविध प्रकारे हे परिणाम स्पष्ट होत आहेत. अरिष्टाशी संबंधित मांडणीमध्ये बहुतेक वेळा ह्या प्रश्नांकडे आर्थिक दृष्टीकोनातून पहिले जाते, आणि तसे करत असताना वेगवेगळ्या शेतकरी समुदायांच्या वास्तवाकडे दुर्लक्ष होते. शेतकऱ्यांचा एक समुदाय म्हणून विचार करताना जात, वर्ग, आणि लिंगभाव आधारित व्यवस्थांमुळे निर्माण होणाऱ्या असमानतांकडे दुर्लक्ष होते.

## महाराष्ट्रातील महिला शेतकरी

महाराष्ट्रातील महिला कामगारांपैकी ८८ टक्के आणि पुरुष कामगारांपैकी ६६ टक्के कामगार शेतीमध्ये गुंतलेले आहेत (PLFS 2020-21). परंतु एकूण भूधारकांपैकी (operational holders)केवळ १५ टक्के भूधारक महिला आहेत (कृषी गणना, २०१५-१६).

ग्रामीण भागातील एकूण बँक खात्यांपैकी ३१ टक्के खाती महिलांच्या नावाने आहेत परंतु बँकेकडून दिल्या जाणाऱ्या एकूण कर्जांपैकी केवळ ७ टक्के कर्ज महिलांना मिळते. पुरुषांसाठी हेच प्रमाण ३० टक्के आहे. बचतगट आणि मायक्रोफायनान्स ह्यांना दिली जाणारी कर्जे विचारात घेतली तरीही हे प्रमाण आठ टक्क्यांच्या वर जात नाही. महिलांनी बँकेत ठेवलेल्या ठेवींच्या तुलनेत त्यांना केवळ २७ टक्के कर्ज उपलब्ध होते. पुरुषांसाठी हेच प्रमाण ५२ टक्के आहे. शेती कसणाऱ्या महिलांपैकी २६ टक्के महिलांना तर शेती कसणाऱ्या पुरुषांपैकी ५५ टक्के पुरुषांना थेट कर्ज मिळते. ह्यावरून शेतकरी महिलांना संस्थात्मक कर्ज मिळण्यामधील संरचनात्मक अडचणी दिसून येतात.

ह्या माहितीवरून शेती क्षेत्रामधील महिलांना मिळणारे दुय्यम स्थान दिसून येते. जमीन आणि इतर संसाधनांवर अधिकार नाही, मजुरीमधील तफावत, मजुरी देणाऱ्या कामाचे कमी झालेले प्रमाण, घरातील कामाचे ओझे ह्यामुळे महिलांच्या शेतीमधील सहभागावर परिणाम होतो. स्वतःच्या शेतीमध्ये आवश्यक ती गुंतवणूक करून तिची उत्पादकता वाढविणे त्यांना शक्य होत नाही.

आर्थिक असुरक्षितता, आणि शोषण करणाऱ्या सामाजिक व्यवस्था ह्यामुळे कुटुंबात आणि कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराची शक्यता वाढते. स्थलांतरित मजूर, शेतमजूर, मक्त्याने शेती करणाऱ्या, एकट्या महिला, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला ह्यांना कामाच्या ठिकाणी हिंसाचाराला तोंड द्यावे लागते. शेतीमधील अरिष्ट आणि स्त्री-पुरुष असमानता ह्यांचा विचार विश्लेषण आणि कृतीकार्यक्रम दोन्ही मध्ये बहुतेक वेळा स्वतंत्रपणे केला जातो.

आम्ही केलेल्या 'शेतीमधील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा हिंसाचार' ह्या महाराष्ट्र, तेलंगणा आणि पंजाब अशा तीन राज्यांत केलेल्या अभ्यासामधून ह्या दोन्हीमधील परस्परसंबंध अधोरेखित होतो आहे. ह्या ठिकाणी महाराष्ट्रातील अकोला, परभणी आणि यवतमाळ अशा तीन जिल्ह्यांत केलेल्या अभ्यासामधून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी केली आहे.

## अभ्यासाबद्दल

### उद्दिष्टे, संकल्पना आणि अभ्यासपद्धती

महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचे त्यांच्या आरोग्यावर, स्वास्थ्यावर आणि आत्मसन्मानावर गंभीर परिणाम होतात. त्यांच्या चांगले आयुष्य जगण्याच्या संधींवर मर्यादा येतात. सार्वजनिक ठिकाणे, रोजगार ह्यामध्ये सहभागी होण्याच्या त्यांच्या क्षमतेवर परिणाम होतो, आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी, मागणी करण्यासाठी संघटीत होण्याची शक्यताही कमी होते. सामाजिक-आर्थिक ध्रुवीकरण आणि पर्यावरणीय ऱ्हास ह्यामुळे महिलांवर होणाऱ्या हिंसाचारात वाढ होते. ह्या सर्व प्रकारे त्यांचे खच्चीकरण करणाऱ्या वातावरणामुळे उपजीविकेच्या कामांमध्ये कार्यशीलपणे सहभागी होणे त्यांना शक्य होत नाही.

स्त्रीवादी संघटनांच्या प्रयत्नांमुळे घरगुती हिंसाचाराच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले, आणि २००५ मध्ये त्याविरोधातील कायदा अस्तित्त्वात आला. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचाराविरोधी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, निषेध आणि निवारण) कायदा, २०१३' हा कायदा २०१३ मध्ये करण्यात आला. ह्या कायद्याची अंमलबजावणी ही शहरी, संघटीत क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली आहे. आमच्या अभ्यासातून आजच्या शेतीच्या परिस्थितीच्या संदर्भात सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

शेतीमधील अरिष्टाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण महिलांवर होणारा दैनंदिन हिंसाचार समजून घेण्याचा प्रयत्न ह्या अभ्यासातून केला आहे. ह्या हिंसाचाराचे स्वरूप, त्याचे प्रकार, आणि त्यामुळे होणारे परिणाम समजून घेणे हा ह्या अभ्यासाचा उद्देश होता.

## हिंसाचाराची व्याख्या

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने कामाच्या संदर्भात महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे – "कामाच्या ठिकाणी किंवा कामाशी संबंधित गोष्टी करत असताना झालेला शारीरिक, लैंगिक, मानसिक हिंसाचार, आर्थिक जबरदस्ती, किंवा अशी कोणतीही कृती ज्यामुळे कामाच्या ठिकाणी किंवा कामाच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त महिलेला हानी पोहोचली असेल किंवा त्रास सहन झाला असेल किंवा करावा लागू शकेल." कामाच्या ठिकाणी महिलांना काय प्रकारचा हिंसाचार/ छळ अनुभवाला येऊ शकतो ह्याची ही व्यापक व्याख्या आहे. कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारा हिंसाचार हा शारीरिक हिंसाचाराशी मर्यादित नसून लैंगिक छळ, शाब्दिक हिंसाचार, दहशत निर्माण करणे, आणि इतर अनेक प्रकारचे गैरवर्तन हा देखील हिंसाचार आहे. त्याचे परिणाम त्यांची सुरक्षितता, स्वास्थ्य आणि आत्मसन्मानावर होत असतो, आणि त्यांना आपल्या पूर्ण क्षमतेनिशी काम करणे शक्य होत नाही.

कामाच्या संदर्भात महिलांवर होणारा हिंसाचार हे मुलभूत मानवी अधिकारांचे उल्लंघन असून स्त्री-पुरुष समानता आणि महिलांचे सबलीकरण ह्यामधील अडथळा आहे असे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने म्हंटले आहे. कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार थांबावा, कामाच्या ठिकाणी संवेदनशील वातावरण निर्माण व्हावे, आणि हिंसाचाराचा सामना केलेल्यांना न्याय आणि सहाय्य मिळावे ह्यासाठी धोरणे आणि उपाययोजना आखाव्यात असे त्यांनी सुचवले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने संरचनात्मक हिंसाचाराची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे – 'संरचनात्मक हिंसाचार म्हणजे सामाजिक संरचना, संस्था, आणि पद्धती ह्यांच्याकडून होणारे महिलांचे शोषण ज्यामुळे त्यांना त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करता येत नाहीत, त्यांच्या अधिकारांचा उपभोग घेता येत नाही, आणि त्यांच्या क्षमतांचा पूर्ण वापर करता येत नाही. ह्यामध्ये आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षितता, राजकीय वंचितता, आणि स्त्री-पुरुष असमानता वाढवणाऱ्या सांस्कृतिक रूढी ह्या सर्वांचा समावेश आहे.'

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या ह्या व्याख्यांच्या आधारे, ह्या अभ्यासाच्या संदर्भात शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार असे म्हणत असताना त्यामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो – शेतकरी म्हणून ओळख नसणे, संसाधनांवरील अधिकार नाकारला जाणे, मजुरीवरील नियंत्रण, आणि जगण्यासाठी महिलांना करावे लागणारे बिनमोलाचे कष्ट. त्याचबरोबर घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार ह्या दोन्ही गोष्टी सातत्याने होणाऱ्या हिंसाचाराच्या भाग आहेत ज्यामुळे त्यांची सुरक्षितता, स्वास्थ्य आणि आत्मसन्मान ह्यावर परिणाम होतो, स्त्री-पुरुष असमानता वाढते, आणि त्यांना शेती क्षेत्रामध्ये पूर्णपणे सहभागी होता येत नाही.

## अभ्यासपद्धती

स्त्रीवादी अभ्यासपद्धतीमध्ये महिलांचे अनुभव केंद्रस्थानी ठेवून संशोधन करणे, आणि त्याद्वारे पारंपारिक प्रतिमानांना आव्हान देणे ह्यावर भर दिला जातो. पारंपारिक संशोधनातील पुरुषप्रधान पूर्वग्रह आणि त्यामुळे महिलांच्या प्रश्नांची होणारी उपेक्षा ह्यावर प्रतिसाद म्हणून स्त्रीवादी अभ्यासपद्धती उदयास आली. ह्या अभ्यासपद्धतीमध्ये वस्तुनिष्ठता, तटस्थता ह्या संकल्पांनाना आव्हान देऊन त्याऐवजी आत्मपरीक्षणात्मक संशोधनावर भर देण्यात आला. त्याचबरोबर जात, वर्ग, आणि लिंगभाव हे परस्परांशी जोडलेले असतात हे देखील ह्या अभ्यासपद्धतीमध्ये मानले जाते. ह्या अभ्यासपद्धतीमध्ये सहभागी

संशोधनाला प्राधान्य दिले जाते, ज्यामध्ये ज्यांच्याबरोबर संशोधन केले जाते त्यांचा सक्रीय सहभाग असेल. स्त्रीवादी अभ्यासपद्धतीमध्ये माहिती गोळा करण्याच्या विविध पद्धती वापरण्यावर भर दिला जातो. तसेच संशोधनाकडे सामाजिक बदल घडवून आणण्याचे साधन म्हणून बघितले जाते. हा अभ्यास करत असताना ह्या तत्त्वांच्या आधारे करण्यात आला.

अभ्यासामध्ये सर्व्हे, गटचर्चा, केस स्टोरीज, विविध पातळीवरील जाणकारांच्या मुलाखती, गावाची प्रोफाईल, आणि दुय्यम माहितीचे संकलन अशा पद्धती अभ्यासात वापरण्यात आल्या. ह्या पद्धतींच्या माध्यमातून विविध प्रकारच्या महिलांशी संवाद साधण्यात आला. अभ्यासात वापरण्यात आलेल्या पद्धती पुढील कोष्टकावरून लक्षात येतील.

**कोष्टक १ – अभ्यासात वापरलेल्या विविध पद्धती**

| पद्धत | सहभागी व्यक्ति | माहिती घेतलेले विषय |
|---|---|---|
| गटचर्चा | भूमिहीन मजूर महिला, एकट्या महिला, शेती कसणाऱ्या महिला अशा विविध गटांबरोबर गटचर्चांच्या माध्यमातून साधारण ३२५ महिलांशी चर्चा | शेतीमध्ये झालेले बदल आणि त्याचा महिलांची उपजीविका, त्यांचे काम आणि आयुष्यावर होणारा परिणाम, हिंसाचाराचे अनुभव |
| सर्व्हे | तीन जिल्ह्यांमधील २२ गावांतील शेतकरी/ शेतमजूर महिला<br>एकूण १३६२ महिलांचा सर्व्हे | उपजीविकेचे पर्याय, शेतीमधील संकटाचे परिणाम, सरकारी योजनांचा लाभ, हिंसाचाराचे अनुभव |
| तपशिलात मुलाखती | शेतकरी महिला, एकट्या महिला, मक्त्याने शेती करणाऱ्या, शेतमजूर अशा वेगवेगळ्या प्रकारच्या शेतकरी महिला<br>एकूण २५ महिलांच्या तपशिलात मुलाखती<br>ह्यामध्ये काही महिलांच्या फोटो स्टोरीज ही करण्यात आल्या | शेतकरी महिला म्हणून त्यांचे अनुभव |
| जाणकारांच्या मुलाखती | गावपातळीवरील अंगणवाडी सेविका, आशा वर्कर ह्यासारखे कर्मचारी<br>जिल्ह्यातील सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी<br>सखी सेंटर, जिल्हा महिला व बाल कल्याण विभाग, भरोसा सेल ह्यामधील अधिकारी<br>एकूण ३२ मुलाखती | गावाची माहिती, गावातील महिलांचे प्रश्न<br>जिल्ह्यात शेतकरी महिलांच्या विषयावर काम करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी<br>जिल्ह्यामधील महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराची परिस्थिती आणि त्यासंबंधी निवारण यंत्रणा |

ह्याशिवाय अभ्यासात सहभागी असणाऱ्या तीनही जिल्ह्यांमध्ये तसेच विदर्भामध्ये एक विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये एकूण मिळून ३००-३५० व्यक्ति सहभागी झाल्या. ह्यामध्ये शेतकरी महिला, सरकारी अधिकारी, सामाजिक संस्था – संघटनांचे प्रतिनिधी, स्थानिक कॉलेजमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी अशा सर्वांचा समावेश होता. ह्या कार्यशाळांमध्ये जिल्ह्यातून समोर येत असलेल्या माहितीची मांडणी करण्यात आली आणि त्यावरील प्रतिक्रिया घेण्यात आल्या. पुढील दिशा ठरविण्याच्या दृष्टीने ह्या कार्यशाळा महत्वाच्या ठरल्या.

अभ्यासाच्या पहिल्या टप्प्यात गटचर्चा घेऊन शेतीमध्ये झालेले बदल आणि त्याचे महिलांवर होणारे परिणाम समजून घेतले. मकाम नेटवर्कच्या स्थानिक संपर्कामधील महिलांबरोबर ह्या चर्चा घेण्यात आल्या. त्याचा उपयोग सर्वे आणि तपशिलात मुलाखतींच्या प्रश्नावली तयार करण्यासाठी झाला.

सर्व्हेच्या माध्यमातून अकोला, परभणी आणि यवतमाळ जिल्ह्यांतील २२ गावांमधून एकूण १३६२ महिलांकडून माहिती घेण्यात आली. माहितीसाठी महिलांची निवड करत असताना वेगवेगळ्या पातळीवर नमुना निवडीसाठीचे निकष लावण्यात आले. तालुके आणि त्यामधील गावांची निवड करत असताना मकाम नेटवर्कचे काम ज्या भागात आहे त्या तालुके आणि गावांना प्राधान्य देण्यात आले. त्याचबरोबर अनुसूचित जाती-जमातींचे प्रमाण, सिंचनाच्या सोयी, कुटुंबसंख्या ह्या गोष्टी विचारात घेऊन, त्यामधील विविधता निवड केलेल्या गावांमध्ये असेल ह्याची खात्री केली. गावामधून कुटुंबांची निवड करत असताना, नमुना म्हणून प्रत्येक गावातील दहा टक्के कुटुंबांचा समावेश केला. कुटुंबांची निवड करत असताना त्या गावात असणाऱ्या सर्व जाती—धर्माच्या कुटुंबांचा समावेश त्यामध्ये असेल ह्याची खात्री करण्यात आली. गावातील कुटुंबांची जातीनिहाय माहिती अंगणवाडीमधून मिळवून, प्रत्येक जातीमधील १०% कुटुंबांची 'रँडम सॅम्पलिंग' पद्धतीने निवड केली. कुटुंबांची निवड केल्या नंतर त्यामधील महिलेची निवड करण्यासाठी ज्या महिलांचे वय १८-६० वर्षांमध्ये वय असणाऱ्या महिला, तसेच शेती, शेतमजुरी किंवा शेतीशी संबंधित कामामध्ये सहभागी असणाऱ्या महिलांचा समावेश केला. तसेच त्या गावात आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला असल्यास त्यांचा विशेष समावेश देखील सर्वे मध्ये करण्यात आला.

सर्वे केलेल्या गावांचा संदर्भ समजून घेण्यासाठी गाव पातळीवरील कर्मचारी (ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर), आणि गावातील इतर लोकांकडून गावासंदर्भात माहिती गोळा केली.

## अभ्यासाचे क्षेत्र

हा अभ्यास विदर्भातील अकोला आणि यवतमाळ जिल्हा आणि मराठवाड्यातील परभणी जिल्हा अशा तीन जिल्ह्यांमध्ये करण्यात आला. अकोल्यामधील अकोला आणि मुर्तीजापूर, यवतमाळ मधील राळेगाव आणि कळंब, आणि परभणी मधील परभणी हे तालुके अभ्यासात समाविष्ट होते. ह्या भागात ह्या जिल्ह्यांमधील लोकसंख्या आणि शेतीची परिस्थिती काय आहे ह्याची थोडक्यात माहिती दिली आहे.

विदर्भातील अकोला जिल्हा १९६० पासून महाराष्ट्र राज्याचा भाग आहे. १९९८ मध्ये पूर्वीच्या अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन अकोला आणि वाशीम असे दोन स्वतंत्र जिल्हे करण्यात आले. आता अकोला जिल्ह्यामध्ये ७ तालुके असून जिल्ह्याचे एकूण क्षेत्र ५४२८ चौ किमी आहे. २०११ च्या जनगणने प्रमाणे जिल्ह्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या २० टक्के तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ५.५ टक्के आहे. जिल्ह्यातील बाल जन्म गुणोत्तर ९१२ असून महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण ८३% आहे.

जिल्ह्यातील एकूण शेती कसणाऱ्यांपैकी २५% तर एकूण शेतमजुरांपैकी ४०% महिला आहेत. जिल्ह्यामध्ये सिंचनाचे प्रमाण कमी असून एकूण शेतकऱ्यांमध्ये सीमांत आणि छोट्या शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे.

२०११ च्या जनगणनेप्रमाणे परभणी जिल्ह्याची लोकसंख्या १८,३६,०८६ असून त्यापैकी अनुसूचित जातींच्या लोकसंख्येचे प्रमाण १३.४७ टक्के तर अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण २.२१ टक्के आहे. साक्षरतेचे सरारी प्रमाण ७३.३४ टक्के असून महिलांमध्ये हे प्रमाण ६३.६३ टक्के आहे. जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर ९४७ असून, बाल जन्म गुणोत्तर ८४४ आहे. NFHS (५) च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील २०-२४ वयोगटातील महिलांमध्ये बालविवाहाचे प्रमाण ४८ टक्के होते. राज्याच्या आकडेवारीच्या तुलनेत हे प्रमाण कितीतरी अधिक आहे. माहितीच्या अधिकाराखाली मागवलेल्या महितीप्रमाणे परभणी जिल्ह्यात २०१४ ते २०२१ ह्या काळात ८८३ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत.

जिल्ह्यातील एकूण काम करणाऱ्या लोकांपैकी ३४ टक्के लोक शेतीमध्ये तर ३५ टक्के लोक शेतमजुरीमध्ये गुंतलेले आहेत. एकूण पुरुष कामगारांपैकी शेतमजुरी करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण २९ टक्के आहे, तर महिलांसाठी हे प्रमाण ४३ टक्के आहे. तसेच एकूण शेती करणाऱ्यांपैकी महिलांचे प्रमाण ३९ टक्के असून, एकूण शेत मजुरी करणाऱ्यांपैकी महिलांचे प्रमाण ४९ टक्केआहे. ह्यावरून महिला कामगारांमध्ये मजुरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कसे अधिक आहे हे दिसून येते.

२०१५-१६ च्या कृषी गणने प्रमाणे जिल्ह्यातील एकूण भूधारकांपैकी छोट्या आणि सीमांत भूधारकांचे प्रमाण ८५ टक्के असून, त्यांच्याकडे असलेल्या जमिनीचे प्रमाण ४७ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी २५ टक्के क्षेत्र सिंचित आहे. कोरडवाहू क्षेत्रात ज्वारी, बाजरी, कापूस, सोयाबीन आणि डाळी ही प्रमुख पीके असून सिंचित प्रदेशात ऊस, गहू, आणि फळे ही पीके घेतली जातात.

विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यामधील १६ तालुक्यांमध्ये मिळून २१३७ गावे आहेत. २०११ च्या जणगणने प्रमाणे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी  लोकसंख्या अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण ११.८५ टक्के असून अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण १८.५४ टक्के आहे. यवतमाळ जिल्ह्याचे लिंगगुणोत्तर ९५२ असून, महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण ६७टक्के आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील एकूण क्षेत्रापैकी ८२ टक्के क्षेत्र असिंचित आहे. एकूण भूधारकांपैकी ६० टक्के हे सीमांत आणि छोटे शेतकरी आहेत. तर एकूण भूधारकांपैकी महिला भूधारकांचे प्रमाण १६ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण पिकाखालिल क्षेत्रापैकी कापसाखालील क्षेत्र ४८ टक्के आहे.

अभ्यासासाठी निवडलेले तीनही जिल्हे आणि त्यातील तालुके हे कोरडवाहू आहेत आणि त्याठिकाणी शेतीमधील संकटांचे परिणाम शेतकरी आत्महत्या आणि स्थलांतर ह्या स्वरुपात प्रकर्षाने दिसून येतात.


यवतमाळमध्ये इतर दोन जिल्ह्यांच्या तुलनेत शेतकऱ्यांच्या आत्महत्या जास्त आहेत. तीनही जिल्ह्यांतील लिंग विषमता बालविवाह, महिला साक्षरता, बाल लिंग गुणोत्तर आणि महिलांवरील अत्याचारांच्या आकडेवारीतून स्पष्टपणे दिसून येते. महिला शेतीमध्ये हे कष्ट करतात ते त्यांच्या जमिनीवरील मालकीमध्ये परावर्तित झालेले दिसत नाही.

पुढील कोष्टकात निवड केलेल्या जिल्ह्यांची माहिती एकत्र दिली आहे.

**कोष्टक २ – अभ्यास केलेल्या जिल्ह्यांची थोडक्यात आकडेवारी**

| तपशील | अकोला | परभणी | यवतमाळ | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| **लोकसंख्या** | | | | |
| अनुसूचित जातीची लोकसंख्या (टक्केवारी) (2011) | 20 | 13.5 | 11.8 | 11.8 |
| अनुसूचित जमातींची लोकसंख्या (टक्केवारी) (2011) | 5.5 | 2.2 | 18.5 | 9.3 |
| बाल जन्म गुणोत्तर (2011) | 912 | 844 | 922 | 920 |
| २०-२४ वयोगटातील महिलांमध्ये बालविवाहाचे प्रमाण (टक्केवारी) (NFHS 5) | 13.5 | 48 | 11.7 | 21.9 |

| तपशील | अकोला | परभणी | यवतमाळ | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| **शेती** | | | | |
| एकूण क्षेत्र (000 हेक्टर) जिल्हा सामाजिक आर्थिक आढावा २०२३ | 540 | 637 | 1352 | 307 lakh ha |
| एकूण क्षेत्रापैकी लागवडीखालील क्षेत्र (टक्केवारी) जिल्हा सामाजिक आर्थिक आढावा २०२३ | 80 | 83 | 68 | 54 |
| लागवडीखालील क्षेत्रापैकी सिंचित क्षेत्र (टक्केवारी) जिल्हा सामाजिक आर्थिक आढावा २०२३ | 14 | 15 | 19 | 18-20 |
| मुख्य पीके जिल्हा सामाजिक आर्थिक आढावा २०२३ | Soyabean Cotton, Tur | Cotton, Sorghum, Soyabean, Tur, Green gram, black gram | Cotton, Soyabean Tur | Tur, Cotton, Sugarcane, Soyabean, Jowar |
| वार्षिक पर्जन्यमान (मिमी) जिल्हा सामाजिक आर्थिक आढावा २०२३ | 860 | 771 | 1109 | 1075 |
| २०१४ ते २०२१ मध्ये झालेल्या शेतकरी आत्महत्या माहितीच्या अधिकाराखाली SCRB कडून मिळविलेली माहिती | 765 | 883 | 1207 | 20700 |
| **महिला शेतकरी** | | | | |
| एकूण भूधारकांपैकी महिला भूधारक कृषी गणना २०१५-१६ | 20 | 16.4 | 16.7 | 15.5 |
| एकूण शेती कसणाऱ्यांपैकी महिला (टक्केवारी) २०११ | 25 | 38 | 34 | 37 |
| एकूण शेतमजुरांपैकी महिला (टक्केवारी) २०११ | 40 | 48 | 46 | |




अभ्यासामध्ये अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर आणि अकोला तालुक्यातील मिळून आठ गावांचा समावेश होता. अकोल्यामधील गावांमध्ये इतर मागासवर्गीय जातीच्या कुटुंबांचे प्रमाण अधिक होते. एका गावामध्ये धरणाचे पाणी उपलब्ध होते, तर इतर सर्व गावांमध्ये विहीर आणि बोअरवेल द्वारे सिंचन करण्यात येत होते. सोयाबीनहे ह्या गावांमधील प्रमुख पीक होते. मागील काही वर्षांमध्ये कापसाच्या पिकाची जागा सोयाबीनने घेतली आहे. दोन गावांमधून कामासाठी स्थलांतर करून लोक जात असल्याची माहिती मिळाली.

अभ्यासात परभणी जिल्ह्यातील परभणी तालुक्यातील चार गावांचा समावेश होता. ह्या गावांमध्ये मराठा जातीच्या कुटुंबांचे प्रमाण अधिक होते. चार गावांपैकी दोन गावांमध्ये कालव्याचे पाणी उपलब्ध होते. सोयाबीन आणि कापूस ही ह्याठिकाणी प्रमुख पीके होती. त्याचबरोबर ऊस आणि एका गावात संत्र्याची लागवड देखील केली जात होती. सर्व गावांमधून स्थलांतर करून कामासाठी लोक इतर ठिकाणी जात होते.

यवतमाळ मध्ये दोन तालुक्यांत मिळून दहा गावांमध्ये अभ्यास करण्यात आला. ह्या गावांमध्ये इतर मागासवर्गीय जातीच्या कुटुंबांचे प्रमाण अधिक होते. त्याचबरोबर अनुसूचित जमातीच्या कुटुंबांचे प्रमाण ही गावांमध्ये अधिक होते. कापूस हे प्रमुख पीक असून, इतर पिकांमध्ये सोयाबीन, तूर, गहू, हरबरा आणि मोसंब ह्या पिकांचा समावेश होता. दहा पैकी पाच गावांमध्ये कालव्याचे पाणी काही प्रमाणात उपलब्ध होते.

अभ्यासात अशाप्रकारे तीन जिल्ह्यातून मिळून २२ गावांचा समावेश होता. ह्या पुढच्या भागामध्ये ज्या महिलांच्या बरोबर अभ्यास करण्यात आला त्यांची माहिती दिली आहे.





# भाग २ : सर्वेमधील महिला कोण होत्या?

ह्या भागामध्ये सर्वेच्या माध्यमातून ज्या १३६२ महिलांकडून माहिती घेतली त्या कोण होत्या ह्याबद्दल मांडणी केली आहे. त्यामध्ये त्यांची प्राथमिक माहिती, त्यांच्या कुटुंबाकडे आणि त्यांच्याकडे असणारी संसाधने, आणि त्यांना मिळणारा सामाजिक सुरक्षेचा लाभ ह्या विषयांचा समावेश आहे. इथून पुढील सर्व भागांमध्ये जी कोष्टके दिली आहेत ती सर्वे मधून घेतलेल्या माहितीवर आधारित असून कंसातील आकडे हे टक्केवारी दर्शवितात.

## प्राथमिक माहिती

पुढील कोष्टकात सर्वे मधील महिलांची जातीप्रमाणे विभागणी लक्षात येईल. परभणी जिल्ह्यामधून निवडलेल्या नमुन्यामध्ये सर्वसाधारण जातीच्या (प्रामुख्याने मराठा) महिला अधिक होत्या तर अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यामध्ये इतर मागासवर्गीय महिलांचे प्रमाण अधिक होते. अनुसूचित जातीच्या महिलांचे प्रमाण अकोला आणि परभणी जिल्ह्यात तुलनेने अधिक होते, तर अनुसूचित जमातीच्या महिलांचे प्रमाण यवतमाळ मध्ये अधिक होते. वर उल्लेख केलेल्या पद्धतीने नमुना निवड केलेली असल्यामुळे, ज्या गावांमधून नमुना निवड करण्यात आली, त्या गावांमधील जातीच्या विभागणीशी हे सुसंगत आहे.

**कोष्टक ३ – सर्वे मधील सहभागी महिलांची जातवार विभागणी** (जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी)

| जात | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण जाती | 48 (8.6) | 138 (46.5) | 5 (1.0) | 191 (14.0) |
| इतर मागास वर्गीय | 215 (38.5) | 17 (5.7) | 242 (47.7) | 474 (34.8) |
| अनुसूचित जाती | 162 (29.0) | 94 (31.6) | 47 (9.3) | 303 (22.2) |
| अनुसूचित जमाती | 18 (3.2) | 0 | 106 (20.9) | 124 (9.1) |
| भटक्या जमाती | 50 (9.0) | 39 (13.1) | 37 (7.3) | 126 (9.3) |
| विमुक्त जमाती | 46 (8.2) | 9 (3.0) | 14 (2.8) | 69 (5.1) |
| विशेष मागास वर्ग | 19 (3.4) | 0 | 56 (11.0) | 75 (5.5) |
| एकूण | 558 | 297 | 507 | |

सर्वेमध्ये सहभागी झालेल्या सर्वाधिक महिला ह्या ३१ ते ५० ह्या वयोगटातील होत्या.

**कोष्टक ४ - सर्वे मधील सहभागी महिलांची वयोगटाप्रमाणे विभागणी**
(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी)

| वयोगट | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १८ ते ३० | 97 (17.4) | 96 (32.3) | 109 (21.5) | 302 (22.2) |
| ३१ ते ४० | 210 (37.6) | 126 (42.4) | 164 (32.3) | 500 (36.7) |
| ४१ ते ५० | 206 (36.9) | 67 (22.6) | 169 (33.3) | 442 (32.5) |
| ५१ ते ६० | 45 (8.1) | 8 (2.7) | 65 (12.8) | 118 (8.7) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

निवडलेल्या नमुन्यामध्ये विवाहित महिलांचे प्रमाण सर्वांत जास्त होते.

**कोष्टक ५ - सर्वे मधील सहभागी महिलांची वैवाहिक स्थितीप्रमाणे विभागणी**
(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी)

| वैवाहिक स्थिती | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विवाहित | 463 (83.0) | 246 (82.8) | 418 (82.4) | 1127 (82.7) |
| अविवाहित | 5 (0.9) | 0 | 1 (0.2) | 6 (0.4) |
| विधवा | 75 (13.4) | 45 (15.2) | 66 (13.0) | 186 (13.7) |
| घटस्फोटीत/परित्यक्त | 15 (2.7) | 6 (2.0) | 22 (4.3) | 43 (3.2) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

सर्वेमधील एकूण १८६ विधवा महिलांपैकी ४२ महिलांनी (२३ टक्के) त्यांच्या नवऱ्याने आत्महत्या केली असल्याचे सांगितले. नमुन्याची निवड करत असताना गावातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांचा जाणीवपूर्वक सर्वेमध्ये समावेश केलेला असल्यामुळे हे प्रमाण अधिक आहे. ४२ पैकी २६ महिलांनी (६२ टक्के) सांगितले की त्यांच्या नवऱ्याची आत्महत्या ही 'शेतकरी आत्महत्या म्हणून पात्र' धरण्यात आली[1].

**कोष्टक ६ - सर्वे मधील सहभागी महिलांचे लग्नाच्या वेळी वय** (जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी)

| लग्नाच्या वेळी वय (वर्षांमध्ये) | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १८ पेक्षा कमी | 127 (23.0) | 211 (71.0) | 101 (20.0) | 439 (32.4) |
| १८ ते २४ वर्षे | 416 (75.2) | 86 (29.0) | 398 (78.7) | 900 (66.4) |
| २५ किवा त्यापेक्षा अधिक | 10 (1.8) | 0 | 7 (1.4) | 17 (1.3) |
| एकूण | 553 | 297 | 506 | 1356 |

तीन जिल्ह्यांमध्ये मिळून ३२ टक्के महिलांचे लग्न १८ वर्षांच्या आत झालेले होते. हे प्रमाण परभणी जिल्ह्यात सर्वाधिक (७१ टक्के) होते. त्यांचे सध्याचे वय आणि लग्नाच्या वेळी असणारे वय ह्यांची तुलना केली तरीही परभणी जिल्ह्यामध्ये हेच चित्र दिसून येते. सध्या ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा कमी आहे अशा महिलांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यामध्ये अनुक्रमे १३ आणि १० टक्के होते. परंतु परभणीसाठी मात्र हेच प्रमाण ४९ टक्के एवढे जास्त होते.

1. शेतकरी आत्महत्या म्हणून पात्र ठरण्यासाठी तीन निकष ठरवलेले आहेत – ती व्यक्ति भूधारक कुटुंबातील असायला हवी, त्या वर्षी नापिकी झालेली असायला हवी, आणि नावाने संस्थात्मक कर्ज असायला हवे.

**कोष्टक ७ - सर्वे मधील सहभागी महिलांची शिक्षणाप्रमाणे विभागणी**
(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी)

| शैक्षणिक स्थिती | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| शालेय शिक्षण नाही | 51 (9.1) | 146 (49.2) | 88 (17.4) | 285 (20.9) |
| १ ते १० पर्यंत | 380 (68.1) | 142 (47.8) | 341 (67.3) | 863 (63.4) |
| १२ पर्यंत | 107 (19.2) | 8 (2.7) | 68 (13.4) | 183 (13.4) |
| पदवी आणि त्यापुढे | 20 (3.6) | 1 (0.3) | 10 (2.0) | 31 (2.3) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

तीन जिल्ह्यात मिळून पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण सर्वात जास्त होते. मात्र जिल्हावार काही फरक दिसून आले. परभणी जिल्ह्यात शाळेत न गेलेल्या आणि पहिली ते दहावी मध्ये शिक्षण असणाऱ्या महिलांचे प्रमाण जवळजवळ सारखे होते. अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात शाळेत न गेलेल्या महिलांचे प्रमाण तुलनेने कमी होते. विशेषतः तरुण महिलांमध्ये – १८ ते ३० वयोगटातील महिलांमध्ये – शाळेत न गेलेल्या महिलांचे प्रमाण अकोल्यामध्ये चार टक्के तर यवतमाळ मध्ये तीन टक्के होते. पण हेच प्रमाण परभणी जिल्ह्यात २२ टक्के होते. ह्यामध्ये जातीप्रमाणे देखील फरक दिसून आले. अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि इतर वंचित जमातींमधील महिलांच्या तुलनेत सर्वसाधारण जाती आणि इतर मागास वर्गीय महिलांमध्ये शिक्षण घेण्याचे प्रमाण अधिक होते. परभणीमध्ये मात्र सर्व जातींच्या स्त्रियांमध्ये शाळेत न जाण्याचे प्रमाण अधिक असलेले दिसले. अनुसूचित जातीच्या महिलांमध्ये ते सर्वाधिक (५६ टक्के) होते. पण त्याचबरोबर सर्वसाधारण जाती (४७ टक्के) आणि इतर मागास वर्गीय महिलांमध्येही (४१ टक्के) ते इतर जिल्ह्यांशी तुलना करता अधिक होते.

## संसाधनांची मालकी

सर्वेमध्ये सहभागी असणाऱ्या महिलांकडे आणि त्यांच्या कुटुंबांकडे असणाऱ्या विविध संसाधनांबद्दल ह्या भागात मांडणी केली आहे.

**जमीन**

**कोष्टक ८ - सहभागी महिलांच्या कुटुंबांमधील जमिनीची मालकी** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| जमिनीची मालकी | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| भूधारक कुटुंबे | 237 (42.5) | 132 (44.8) | 277 (54.6) | 646 (47.4) |
| भूमिहीन कुटुंबे | 321 (57.5) | 165 (55.2) | 230 (45.4) | 716 (52.5) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

सर्वेमध्ये सहभागी असणाऱ्या महिलांपैकी ५२.५ टक्के महिला भूमिहीन कुटुंबातील होत्या. यवतमाळ जिल्ह्याच्या तुलनेत अकोला आणि परभणी जिल्ह्यामध्ये भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण अधिक होते.

जातीप्रमाणे जमिनीची मालकी पाहिल्यास एकूण कुटुंबांमध्ये इतर मागासवर्गीय जातींमध्ये भूधारक कुटुंबांचे प्रमाण अधिक होते. विशेषतः अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये कुणबी समाजातील कुटुंबांचा समावेश अधिक असल्याने त्याठिकाणी इतर मागासवर्गीय जातींमध्ये भूधारक कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे ६२ आणि ६५ टक्के होते. परभणी जिल्ह्यामध्ये मराठा समाजाची कुटुंबे अधिक होती, आणि त्यामुळे सर्वसाधारण जातींमध्ये भूधारक कुटुंबांचे प्रमाण ५७% होते. अनुसूचित जातींच्या कुटुंबांमध्ये अकोला (२६ टक्के) आणि परभणी (२१ टक्के) मध्ये भूधारक कुटुंबांचे प्रमाण यवतमाळ जिल्ह्यापेक्षा (५५ टक्के) तुलनेने कमी होते. परभणी जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातींची कुटुंबे सर्वे मध्ये नव्हती. परंतु यवतमाळ मधील अनुसूचित जमातींच्या कुटुंबांमध्ये भूधारक कुटुंबांचे प्रमाण (४८ टक्के) अकोला जिल्ह्यापेक्षा (२८ टक्के) अधिक होते.

**कोष्टक ९ – सर्वे मधील सहभागी भूधारक कुटुंबांची भूधारणा** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| भूधारणा | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| सीमांत भूधारक (१ हेक्टर पर्यंत) | 140 (59.1) | 78 (59.1) | 40 (14.4) | 258 (39.9) |
| छोटे भूधारक (१ ते २ हेक्टर) | 86 (36.3) | 41 (31.1) | 172 (62.1) | 299 (46.3) |
| सेमी-मध्यम भूधारक (२ ते ४ हेक्टर) | 7 (3.0) | 4 (3.0) | 43 (15.5) | 54 (8.4) |
| मध्यम भूधारक (४ ते १० हेक्टर) | 4 (1.7) | 6 (4.5) | 19 (6.9) | 29 (4.5) |
| मोठे भूधारक (१० हेक्टर पेक्षा अधिक) | 0 | 3 (2.3) | 3 (1.1) | 6 (0.9) |
| एकूण | 237 | 132 | 277 | 646 |

(भूधारणेची वर्गवारी कृषी गणनेच्या निकषांप्रमाणे)

भूधारक कुटुंबांमधील जवळजवळ ४० टक्के कुटुंबे ही सीमांत (एक हेक्टर पर्यंत) तर ४६ टक्के कुटुंबे छोटी भूधारणा (दोन हेक्टर पर्यंत) असणारी होती. परभणी आणि अकोला जिल्ह्यामध्ये सीमांत तर यवतमाळ जिल्ह्यामध्ये छोटी भूधारणा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी होते. एकूण सर्वेमध्ये सहभागी असणाऱ्या कुटुंबांमध्ये ९६ टक्के कुटुंबांकडे दोन हेक्टर पेक्षा अधिक जमीन नव्हती. जिल्ह्यातील ह्या कुटुंबांची जमीन विचारात घेतली तर नमुन्याची जिल्हावार सरासरी भूधारणा पुढील प्रमाणे होती – अकोला ०.४८ हेक्टर, परभणी ०.८२ हेक्टर आणि यवतमाळ १.१५ हेक्टर.

**कोष्टक १० – भूधारक कुटुंबांकडे असणाऱ्या सिंचनाच्या सोयी** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| सिंचनाच्या सोयी | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| सिंचनाची सोय आहे | 94 (39.66) | 44 (33.33) | 94 (33.94) | 232 (35.91) |
| सिंचनाची सोय नाही | 143 (60.34) | 88 (66.67) | 183 (66.06) | 414 (64.09) |
| एकूण | 237 | 132 | 277 | 646 |

एकूण भूधारक कुटुंबांपैकी जवळजवळ ३६ टक्के कुटुंबांकडे सिंचनाची काहीतरी सोय होती. परंतु ६४ टक्के कुटुंबांची पूर्ण जमीन कोरडवाहू होती. सर्वे मधील ६४६ भूधारक कुटुंबांमध्ये मिळून ६४६ हेक्टर जमीन होती. त्यापैकी ६४२.४ हेक्टर (९३ टक्के) जमीन पूर्ण कोरडवाहू होती. परभणी जिल्ह्यामध्ये काही गावांमध्ये कालवा सिंचन उपलब्ध असल्याने सिंचित जमिनीचे प्रमाण थोडे अधिक होते.

## महिलांच्या मालकीची जमीन

**कोष्टक ११ – भूधारक कुटुंबातील महिलांची जमिनीवरील मालकी** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| महिलांच्या मालकीची जमीन | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| मालकीची जमीन आहे | 40 (16.9) | 34 (25.8) | 84 (30.3) | 158 (24.5) |
| मालकीची जमीन नाही | 197 (83.1) | 98 (74.2) | 193 (69.7) | 488 (75.5) |
| एकूण | 237 | 132 | 277 | 646 |

ज्या ६४६ महिला भूधारक कुटुंबातील होत्या त्यापैकी २४.५ टक्के महिलांच्या स्वतःच्या नावाने जमीन होती. ह्यामध्ये जिल्हावार फरक दिसून आले. भूधारक महिलांचे प्रमाण अकोल्यामध्ये सर्वात कमी तर यवतमाळमध्ये सर्वात जास्त होते. जमीन नावाने असण्याचे प्रमाण विधवा महिलांमध्ये (५६ टक्के) विवाहित महिलांच्या (१९ टक्के) तुलनेने अधिक होते. पतीच्या मृत्यूनंतरमहिलेच्या नावाने जमीन होण्याची शक्यता अधिक असते हे त्यावरून दिसून येते.

सर्वेमध्ये एकूण १८६ विधवा महिला होत्या. त्यापैकी ९४ महिला ह्या भूधारक कुटुंबातील होत्या. त्या ९४ महिलांपैकी ७३ टक्के विधवा महिलांना पतीच्या मृत्यूनंतर त्यांच्या जमिनीमध्ये अधिकार मिळाला. उरलेल्या २५ महिलांपैकी १७ महिलांनी जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया केली नव्हती, २ महिलांच्या नवऱ्याच्या स्वतःच्या नावाने जमीन नसल्याने त्यांना अडचण होती, पाच महिलांच्या कुटुंबाकडून विरोध होता, आणि एका महिलेच्या केवळ मुलाच्या नावाने जमीन हस्तांतरित करण्यात आली होती. १७ महिला स्वतःच्या नावाने जमीन नसली तरी ती कसत होत्या. ज्या आठ महिला स्वतः जमीन कसत नव्हत्या त्यापैकी चार महिलांना त्यांच्या सासरच्या कुटुंबाकडून त्या बदल्यात काही मोबदला मिळत होता. तर चार महिला अशा होत्या ज्यांना ना जमिनीवर अधिकार मिळाला ना काही मोबदला.

### पशुधन

सर्वेमधील महिलांपैकी ३३ टक्के महिलांनी त्यांच्याकडे कोणत्या ना कोणत्या प्रकारचे पशुधन असल्याचे सांगितले. त्यामध्ये शेळ्या, कोंबड्या, गायी-बैल, म्हशी ह्यांचा प्रामुख्याने समावेश होता. अनुसूचित जाती (२३ टक्के) आणि सर्वसाधारण जातींमध्ये (२६ टक्के) गुरे असणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वांत कमी होती. विवाहित महिलांपेक्षा (३६ टक्के) विधवा (१९ टक्के) महिलांमध्ये गुरे असणाऱ्या महिलांचे प्रमाण कमी होते. तसेच भूधारक कुटुंबांपेक्षा (४४%) भूमिहीन कुटुंबांमध्ये (२३ टक्के) गुरे असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी होते.

आठ टक्के महिलांनी असे सांगितले की त्यांच्याकडे पूर्वी गुरे होती पण आता नाहीत. आता गुरे नसण्याची कारणे विचारली असता चारा उपलब्ध नाही, कुटुंबामध्ये सांभाळ करायला कोणी नाही ह्या कारणांबरोबरच कर्ज फेडण्यासाठी गुरे विकायला लागली हे कारण देखील समोर आले.

ज्यांच्याकडे गुरे आहेत त्यांना, गुरांच्यापासून मिळणारे उत्पन्न तुम्ही स्वतः ठेवता का असे विचारले असता ५०% महिलांणी होकारार्थी उत्तर दिले.

### इतर संपत्ती आणि साधने

सर्वेमध्ये सहभागी असणाऱ्या कुटुंबांमध्ये भूमिहीन आणि छोट्या-सीमांत शेतकरी कुटुंबांचे प्रमाण अधिक असल्याने शेतीशी संबंधित संसाधने असण्याचे प्रमाण नगण्य होते. ट्रॅक्टर, कापणी मशीन, पॉवर टिलर, वीडर ह्यासारखी मोठी उपकरणे असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण एक ते दोन टक्के होते. १५ टक्के कुटुंबांनी त्यांच्याकडे विहीर तर सात टक्के कुटुंबांनी त्यांच्याकडे बोअरवेल असल्याचे सांगितले. सात टक्के कुटुंबांकडे ठिबक/तुषार सिंचनाची सोय होती.

कुटुंबांमध्ये अधिक प्रमाणात असलेल्या साधनांमध्ये दुचाकी (३७ टक्के), साधा मोबाईल फोन (५२ टक्के) आणि स्मार्ट फोन (७१ टक्के) ह्या तीन साधनांचा समावेश होता. ज्या कुटुंबांमध्ये मोबाईल फोन होता त्यापैकी ५५ टक्के महिलांकडे स्वतःचा फोन होता. परंतु ज्या कुटुंबांमध्ये स्मार्टफोन होता, त्यापैकी केवळ २४ टक्के महिलांकडे स्वतःचा स्मार्ट फोन होता.

**बँकेचे खाते**

**कोष्टक १२ – महिलांच्या नावाने बँक खाते** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| बँकेचे खाते | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| स्वतःचे स्वतंत्र बँक खाते | 471 (84.4) | 244 (82.2) | 352 (69.4) | 1067 (78.3) |
| संयुक्त बँक खाते | 41 (7.3) | 1 (0.3) | 107 (21.1) | 149 (10.9) |
| बँक खाते नाही | 46 (8.2) | 52 (17.5) | 48 (9.5) | 146 (10.7) |
| एकूण | 558 (100.0) | 297 (100.0) | | |

सर्वेमध्ये सहभागी झालेल्या बहुतेक सर्व महिलांचे बँक खाते होते. ७८ टक्के महिलांचे स्वतःचे स्वतंत्र खाते होते आणि त्या स्वतः त्याचे व्यवहार करत होत्या. संयुक्त खाती असण्याचे प्रमाण यवतमाळ जिल्ह्यामध्ये इतर दोन जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक होते. ज्यांच्याकडे बँक खाते नाही अशा महिलांचे प्रमाण हे सर्वसाधारण जाती (२० टक्के) आणि विमुक्त जमाती (१९ टक्के) ह्यांच्यामध्ये इतर जातींच्या तुलनेत अधिक होते. ज्यांची संयुक्त खाती होती त्या बहुतेक सर्व महिला विवाहित होत्या. भूधारक आणि भूमिहीन महिलांमध्ये बँक खात्याच्या संदर्भात विशेष फरक दिसून आला नाही.

बँक खाते असणाऱ्या महिलांपैकी १५ टक्के महिलांकडे ए टी एम कार्ड होते, आणि त्या कार्ड असणाऱ्या महिलांपैकी ५९ टक्के महिला ते कार्ड स्वतः वापरत होत्या.

## मुलभूत सुविधा

सर्वेमधील महिलांपैकी २५ टक्के महिलांच्या स्वतःच्या नावाने घर होते, तर ३० टक्के महिलांच्या संयुक्त नावाने घर होते. ४५ टक्के महिलांनी घर कुटुंबातील इतर व्यक्तिंच्या नावाने असल्याचे सांगितले. घराची मालकी ही विवाहित महिलांपेक्षा विधवा महिलांमध्ये अधिक होती.

सर्वेमध्ये ह्या कुटुंबांना उपलब्ध असणारे पिण्याच्या आणि घरगुती वापराचे स्त्रोत काय आहेत ह्याबाबत माहिती घेतली. अकोल्यामध्ये पिण्याचे आणि इतर घरगुती अशा दोन्ही वापरासाठी महिला प्रामुख्याने गावातील नळ पाणी योजनेचे स्वतःच्या घरात खाजगी नळाने येणारे पाणी वापरत होत्या. परभणीमध्ये निम्म्याच महिला नळाने येणारे योजनेचे पाणी घरगुती आणि पिण्याच्या पाण्यासाठी वापरत होत्या. २५ टक्के महिला ह्या पाण्यासाठी इतर लोकांच्या विहिरी आणि बोअरवेलवर अवलंबून होत्या. यवतमाळमध्ये पिण्याच्या आणि घरगुती दोन्ही वापरांसाठी सार्वजनिक विहिरी आणि हातपंप वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक होते.

कुटुंबासाठी पाणी आणणे ही प्रामुख्याने महिलांची जबाबदारी होती. ७४ टक्के महिलांनी त्या स्वतः किंवा घरातील इतर महिला पूर्णपणे पाणी आणण्याची जबाबदारी उचलतात असे सांगितले. २४ टक्के महिलांनी घरातील पुरुष देखील त्यामध्ये मदत करतात असे म्हंटले.

७७ टक्के महिलांनी त्यांच्याकडे वापरण्यायोग्य शौचालय असल्याचे सांगितले.

## सामाजिक सुरक्षा

**कोष्टक १३ – सर्वेमधील महिलांना मिळणारा सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| योजना | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| उज्वला गॅस योजना | 214 (38.4) | 143 (48.1) | 277 (54.6) | 634 (46.5) |
| घरकुल | 185 (33.2) | 46 (15.5) | 118 (23.3) | 349 (25.6) |
| महात्मा फुले जनआरोग्य अभियान/ आयुष्यमान भारत | 69 (12.4) | 0 | 34 (6.7) | 103 (7.6) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

एकूण महिलांपैकी २६ टक्के महिलांना सरकारी योजनेमधून घर मिळाले होते. घर मिळालेल्या महिलांचे प्रमाण अकोल्यामध्ये ३३ टक्के, यवतमाळ मध्ये २३ टक्के तर परभणी मध्ये सर्वात कमी १६ टक्के होते.

एकूण महिलांपैकी ४७ टक्के महिलांना उज्वला गॅस योजनेचा लाभ मिळाला होता.

महात्मा फुले जनआरोग्य योजना/ आयुष्यमान भारत योजनेचा लाभ एकूण महिलांपैकी केवळ ८ टक्के महिलांना मिळाला होता. अकोल्यामध्ये हे प्रमाण १२ टक्के तर यवतमाळमध्ये सात टक्के होते. परभणीमध्ये एकाही महिलेने ह्या योजनांचा लाभ मिळत असल्याचे सांगितले नाही.

विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत अशा एकूण २२६ एकट्या महिला सर्वेमध्ये होत्या त्यापैकी १८ टक्के महिलांना पेन्शन मिळत होते. पेन्शन मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण अकोल्यामध्ये २१ टक्के, यवतमाळ मध्ये २२ टक्के तर परभणी मध्ये फक्त ४ टक्के होते.

## सामाजिक – राजकीय भांडवल

सर्वेमधील महिला गाव पातळीवरील कोणत्या संस्थांच्या, उदाहरणार्थ पाणी वापर संस्था, पाणलोट विकास समिती, पतसंस्था इत्यादीच्या सभासद होत्या का ह्याबाबत माहिती घेण्यात आली. एकूण पाच महिला सरपंच सर्वेमध्ये सहभागी होत्या. त्यातील चार महिला यवतमाळमधील तर एक महिला अकोला जिल्ह्यातील होती. तीन इतर मागासवर्गीय, तर अनुसूचित जाती आणि जमातीच्या प्रत्येकी एका महिलेचा त्यामध्ये समावेश होता. पाच पैकी चार महिला भूधारक कुटुंबातील होत्या तर एक महिला भूमिहीन कुटुंबातील होती.

अकोला आणि यवतमाळमधील प्रत्येकी एक महिला ग्रामपंचायत सदस्य होती. ह्या दोन्ही महिला इतर मागासवर्गीय आणि भूधारक कुटुंबातील होत्या.

परभणीमधील चार आणि यवतमाळमधील एक महिला वॉर्ड सदस्य होत्या. त्यापैकी दोन सर्वसाधारण जातीमधील तर प्रत्येकी एक अनुचित जमाती आणि भटक्या जमातीमधील होत्या. तीन महिला भूमिहीन तर एक महिला भूधारक कुटुंबातील होती.

बचतगट वगळता इतर संस्थांचे सभासदत्व नगण्य होते. सर्वेमधील महिलांपैकी ६३ टक्के महिला बचतगटाच्या सभासद होत्या. विवाहित आणि विधवा महिलांच्या सभासदत्वामध्ये फारसा फरक दिसून आला नाही. परंतु इतर एकट्या महिलांमध्ये (घटस्फोटीत/परित्यक्ता) प्रमाण तुलनेने कमी होते. बचतगटाचे सभासदत्व सर्वसाधारण महिलांमध्ये सर्वांत कमी (४३ टक्के) तर इतर मागासवर्गीय महिलांमध्ये (७१ टक्के) सर्वांत जास्त होते.



# भाग ३ : ग्रामीण महिलांची उपजीविका

ह्या भागामध्ये ग्रामीण महिलांच्या उपजीविकेसंदर्भात समोर आलेल्या विविध प्रश्नांची मांडणी केलेली आहे.

## उपजीविकेचे पर्याय

सर्वेमध्ये महिलांना त्या उपजीविकेशी संबंधित कोणकोणत्या विविध कामांमध्ये गुंतलेल्या आहेत हे विचारले असता, पुढील चित्र समोर आले.

**कोष्टक १४ – सर्वे मधील महिलांचे उपजीविकेचे पर्याय** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| उपजीविकेचे पर्याय | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| शेती | 218 (39.1) | 115 (38.7) | 276 (54.4) | 609 (44.7) |
| शेतमजुरी | 466 (83.5) | 254 (85.5) | 361 (71.2) | 1081 (79.4) |
| इतर मजुरी | 53 (9.5) | 13 (4.4) | 19 (3.7) | 85 (6.2) |

| उपजीविकेचे पर्याय | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| स्थलांतर | 6 (1.1) | 33 (11.1) | 3 (0.6) | 42 (3.1) |
| पशुपालन | 18 (3.2) | 7 (2.4) | 8 (1.6) | 33 (2.4) |
| घरेलू कामगार | 2 (0.4) | 0 | 2 (0.4) | 4 (0.3) |
| दुग्धव्यवसाय | 4 (0.7) | 3 (1.0) | 3 (0.6) | 10 (0.7) |
| छोटा व्यवसाय | 4 (0.7) | 0 | 3 (0.6) | 7 (0.5) |
| गृहउद्योग | 8 (1.4) | 1 (0.3) | 12 (2.4) | 21 (1.5) |
| गाव पातळीवरील कर्मचारी | 8 (1.4) | 2 (0.7) | 5 (1.0) | 15 (1.1) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

उपजीविकेच्या पर्यायांपैकी शेतमजुरी करणाऱ्या महिलांची टक्केवारी (७९ टक्के) सर्वात जास्त होती. ४४.७ टक्के महिला ह्या शेती करणाऱ्या होत्या. त्यामध्ये स्वतःच्या कुटुंबाची जमीन कसणाऱ्या तसेच मक्त्याने शेती घेऊन कसणाऱ्या अशा दोन्ही महिलांचा समावेश होता. ह्याशिवाय इतर कामांमध्ये गुंतलेल्या महिलांचे प्रमाण फार कमी होते. ह्या माहितीवरून ग्रामीण भागात महिलांना उपजीविकेचे किती मर्यादित पर्याय उपलब्ध आहेत हे स्पष्ट होते.

सर्वेमध्ये सहभागी झालेल्या ह्या महिलांच्या उपजीविकेचे शेती आणि शेतमजुरी हे दोन पर्याय प्रामुख्याने समोर आल्याने ह्या दोन कामांमध्ये गुंतलेल्या महिलांचे प्रश्न तपशिलात जाऊन समजून घेण्याचा प्रयत्न ह्यापुढील भागात केला आहे. शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या ह्या महिलांमध्ये अर्थातच दोन्ही कामांमध्ये गुंतलेल्या महिला अनेक होत्या. त्यामुळे कामाच्या प्रकारानुसार त्यांची विभागणी कशी होती, आणि त्या महिला कोण होत्या हे आधी थोडक्यात बघू.

**कोष्टक १५ – उपजीविकेसाठी करत असलेल्या कामाप्रमाणे महिलांची विभागणी** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| फक्त शेती करणाऱ्या महिला | 81 (14.5) | 33 (11.1) | 136 (26.8) | 250 (18.4) |
| फक्त मजुरी करणाऱ्या महिला | 329 (59) | 172 (57.9) | 221 (43.6) | 722 (53) |
| शेती आणि मजुरी दोन्ही करणाऱ्या महिला | 137 (24.6) | 82 (27.6) | 140 (27.6) | 359 (26.4) |
| शेती आणि मजुरीशिवाय इतर काम करणाऱ्या महिला | 11 (2) | 10 (3.4) | 10 (2) | 31 (2.3) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |

महिलांच्या कामाप्रमाणे त्यांची विभागणी पाहिल्यास एकूण महिलांमधील सर्वाधिक महिला (५३ टक्के) ह्या फक्त शेतमजुरी करणाऱ्या होत्या. ह्यामध्ये प्रामुख्याने भूमिहीन महिलांचा समावेश होता. एकूण महिलांमध्ये १८.४ टक्के महिला ह्या फक्त

शेती करणाऱ्या होत्या. शेती आणि शेतमजुरी अशी दोन्ही कामे करणाऱ्या महिलांचे प्रमाण २६.४ टक्के होते. शेती आणि शेतमजुरी ह्या दोन्ही गोष्टी करत नाहीत आणि इतर कामात गुंतलेल्या आहेत अशा महिलांचे प्रमाण केवळ २.३ टक्के होते. वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या ह्या महिला कोण होत्या हे पाहिले तर काही महत्वाच्या गोष्टी समोर येतील.

**कोष्टक १६ – कुटुंबाच्या जमिनीच्या मालकीप्रमाणे वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला**
(जमिनीच्या मालकीमध्ये टक्केवारी)

| कुटुंबाच्या मालकीची जमीन | फक्त शेती करणाऱ्या | फक्त शेतमजुरी करणाऱ्या | शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या | इतर काम करणाऱ्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| भूमिहीन कुटुंबे | 10 (1.4) | 643 (89.8) | 38 (5.3) | 25 (3.5) | 716 |
| भूधारक कुटुंबे | 240 (37.2) | 79 (12.2) | 321 (49.7) | 6 (0.9) | 646 |
| एकूण | 250 (18.4) | 722 (53.0) | 359 (26.4) | 31 (2.3) | 1362 |

भूमिहीन महिलांपैकी जवळजवळ ९० टक्के महिला ह्या पूर्णपणे शेतमजुरीवर अवलंबून आहेत. उरलेल्या दहा टक्के महिलांपैकी ज्यांनी त्या शेती करत असल्याचे सांगितले आहे त्या मक्त्याने शेती घेऊन करत आहेत.

भूधारक कुटुंबातील महिलांपैकी 37 टक्के महिला ह्या फक्त शेती करणाऱ्या आहेत, तर जवळजवळ ५० टक्के महिला ह्या शेतीच्या बरोबरीने मजुरीवर देखील अवलंबून आहेत. भूधारक कुटुंबातील ज्या १२ टक्के महिला पूर्णपणे मजुरीवर अवलंबून आहेत त्यांनी आपली शेती मक्त्याने दिली असून त्या स्वतः मजुरीचे काम करतात.

**कोष्टक १७ – भूधारक कुटुंबांच्या भूधारणेप्रमाणे वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला**
(भूधारणा वर्गामध्ये टक्केवारी)

| भूधारक कुटुंबांची भूधारणा | फक्त शेती करणाऱ्या | फक्त शेतमजुरी करणाऱ्या | शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या | इतर काम करणाऱ्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| सीमांत भूधारक | 60 (23.3) | 40 (15.5) | 157 (60.9) | 1 (0.4) | 258 |
| छोटे भूधारक | 130 (43.5) | 32 (10.7) | 132 (44.1) | 5 (1.7) | 299 |
| सेमी-मध्यम भूधारक | 29 (53.7) | 6 (11.1) | 19 (35.2) | 0 (0.0) | 54 |
| मध्यम भूधारक | 19 (65.5) | 1 (3.4) | 9 (31.0) | 0 (0.0) | 29 |
| मोठे भूधारक | 2 (33.3) | 0 (0.0) | 4 (66.7) | 0 (0.0) | 6 |
| एकूण | 240 (37.2) | 79 (12.2) | 321 (49.7) | 6 (0.9) | 646 |

छोट्या आणि सीमांत शेतकऱ्यांमध्ये शेती आणि शेतमजुरी दोन्ही करणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक होते.

**कोष्टक १८ – जातीप्रमाणे वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला** (जातीमध्ये टक्केवारी)

| जात | फक्त शेती करणाऱ्या | फक्त शेतमजुरी करणाऱ्या | शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या | इतर काम करणाऱ्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण जाती | 30 (15.7) | 96 (50.3) | 57 (29.8) | 8 (4.2) | 191 |
| इतर मागासवर्गीय | 138 (29.1) | 180 (38.0) | 146 (30.8) | 10 (2.1) | 474 |
| अनुसूचित जाती | 25 (8.3) | 222 (73.3) | 50 (16.5) | 6 (2.0) | 303 |
| अनुसूचित जमाती | 21 (16.9) | 65 (52.4) | 37 (29.8) | 1 (0.8) | 124 |
| विमुक्त जाती | 22 (17.5) | 62 (49.2) | 36 (28.6) | 6 (4.8) | 126 |
| भटक्या जमाती | 7 (10.1) | 49 (71.0) | 13 (18.8) | 0 (0.0) | 69 |
| विशेष मागास प्रवर्ग | 7 (9.3) | 48 (64.0) | 20 (26.7) | 0 (0.0) | 75 |
| एकूण | 250 (18.4) | 722 (53.0) | 359 (26.4) | 31 (2.3) | 1362 |

इतर मागासवर्गीय महिलांमध्ये फक्त शेती करणाऱ्या महिलांचे प्रमाण इतर जातींच्या तुलनेत अधिक आहे. त्याच बरोबर अनुसूचित जाती आणि त्याखालोखाल विमुक्त जमातींमध्ये केवळ मजुरीवर अवलंबून असणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. सुरुवातीच्या महिलांच्या माहितीच्या भागामध्ये आपण जातीप्रमाणे जमिनीच्या मालकी संदर्भात चर्चा केली होती, त्याच्याशी हे सुसंगत आहे.

## शेती कसणाऱ्या महिला

ह्या आधी दिलेल्या कोष्टक क्रमांक १५ मध्ये दाखविल्या प्रमाणे फक्त शेती करणाऱ्या आणि शेती आणि मजुरी दोन्ही करणाऱ्या अशा मिळून ६०९ महिला (सर्वे मधील एकूण महिलांच्या ४५ टक्के) शेती कसण्याच्या कामात गुंतलेल्या होत्या. ह्या भागामध्ये त्यांच्याकडून सर्वे मधून आलेली माहिती तसेच तपशीलातील मुलाखती आणि गटचर्चांमधून आलेली माहिती ह्या आधारे शेती मधील बदलते संदर्भ आणि शेती करताना त्यांना येणाऱ्या अडचणी ह्याबद्दल मांडणी केली आहे.

### पीकपद्धती

सर्वेमध्ये महिलांनी २०२२-२३ वर्षामध्ये कोणती पीके घेतली होती ह्याबद्दलची माहिती पाहिली असता ह्या भागामधील एकसुरी पीक पद्धती लक्षात येते.

**कोष्टक १९ – सर्वे मधील शेती कसणाऱ्या महिलांनी २०२२-२३ मध्ये घेतलेली पीके**
(जिल्ह्यामधील टक्केवारी)

| पीक | अकोला | परभणी | यवतमाळ |
|---|---|---|---|
| कापूस | 16 (8) | 44 (46) | 257 (99) |
| सोयाबीन | 192 (94) | 57 (60) | 33 (13) |
| डाळी | 137 (67) | 9 (9) | 215 (83) |
| गहू | 19 (9) | 8 (8) | 22 (8) |
| ज्वारी | 0 (0) | 8 (8) | 8 (3) |
| इतर तेलबिया | 0 (0) | 5 (5) | 2 (1) |
| मका | 0 (0) | 0 (0) | 1 (0) |
| भाज्या आणि मसाले | 20 (10) | 2 (2) | 4 (2) |
| फळे | 1 (0) | 0 (0) | 2 (1) |
| ऊस | 0 (0) | 4 (4) | 0 (0) |
| माहिती दिलेल्या महिलांची संख्या | 204 | 95 | 260 |

यवतमाळ मधील ९९ टक्के महिलांनी त्यावर्षी कापसाचे पीक घेतलेले होते, तर अकोल्यामधील ९४ टक्के महिलांनी सोयाबीनचे पीक घेतले होते. परभणी जिल्ह्यात कापूस आणि सोयाबीन अशा दोन्ही मुख्य पिकांचा अंतर्भाव होता, आणि ६० टक्के महिलांनी कापूस आणि ४६ टक्के महिलांनी सोयाबीनचे पिक घेतल्याचे सांगितले. अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यामध्ये आंतरपीक म्हणून तूर पिकवण्याची पद्धत असल्याने यवतमाळमधील ८३ आणि अकोल्यामधील ६७ टक्के महिलांनी डाळी पिकविल्याचे दिसते. परंतु कापूस आणि सोयाबीनच्या तुलनेत ते प्रमाण कमी आहे. परभणी मध्ये डाळी पिकविल्याचे फक्त ९ टक्के महिलांनी सांगितले. इतर अन्नधान्याची पीके किंवा भाजीपाला पिकविणाऱ्या महिला फारच कमी होत्या.

मुलाखती आणि गटचर्चांमध्ये महिलांनी बदलत गेलेल्या पीक पद्धतीबद्दल विस्ताराने चर्चा केली. अकोला जिल्ह्यातील सविताने सांगितले कि, “तणनाशकं वापरून जमीन खराब झाली आहे, त्यामध्ये सोयाबीनशिवाय काही उगवत नाही. पण तणनाशक तर वापरावं लागतंय. मजुरीचे दर वाढलेले आहेत, त्यामुळे निंदायला मजूर लावणं परवडत नाही.” ह्याशिवाय जंगली जनावरांचा त्रास, गावाची एकूण पीक पद्धती, बाजारभाव अशा अनेक कारणांमुळे सध्या रूढ झालेल्या पीक पद्धतीपासून वेगळे काही करण्याची इच्छा असूनही ते शक्य होत नाही. सध्याच्या शेती पद्धतीचे तोटे लक्षात येत असले तरी त्यामधून बाहेर पडण्यासाठी काही करणे त्यांच्या हातात नाही असे त्यांना वाटते. शेतीमधील काम कमी होणे, अन्न आणि पोषण सुरक्षेवर परिणाम, नुकसानाचा वाढलेला धोका असे ह्या पीक पद्धतीचे झालेले परिणाम त्यांच्या बोलण्यातून समोर आले.

**पिकांचे नुकसान**

मागील दोन वर्षांत तुमच्या पिकांचे नुकसान झाले आहे का असा प्रश्न सर्वेमध्ये विचारण्यात आला होता. त्यावर यवतमाळमधील ९४ टक्के, अकोल्यामधील ५३ टक्के आणि परभणीमधील ७४ टक्के महिलांनी होकारार्थी उत्तर दिले. पिकांचे नुकसान होण्यामागे हवामानातील बदल (९९ टक्के), जंगली जनावरांचा त्रास (७६ टक्के) आणि किडीचा प्रादुर्भाव (७४ टक्के) अशी तीन कारणे प्रामुख्याने समोर आली. ज्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते अशापैकी केवळ २१ टक्के महिलांना नुकसानभरपाई मिळाली. ह्या महिला प्रामुख्याने कापूस उत्पादक यवतमाळ जिल्ह्यातल्या होत्या.

**मालाची खरेदी – विक्री**

सर्वे मधील ७० टक्के महिलांनी सांगितले की वर्षाच्या सुरुवातीला त्यांनी उधारीवर निविष्ठा विकत घेतल्या, जून २०२३ मध्ये सर्वे झाला त्यावेळी त्यापैकी ९४ टक्के महिलांनी ती उधारी फेडली होती, जेणे करून त्यांना पुढील वर्षासाठी पुन्हा बियाणे उधारीवर घेता येईल. अशा प्रकारे खते-बियाणे इत्यादी निविष्ठा विकत घेत असताना त्यांना काय अडचणी येतात हे पाहिले असता २३ टक्के महिलांनी सांगितले की अशा वेळी ज्या व्यापाऱ्याकडून निविष्ठा घेतल्या त्याच व्यापाऱ्याला माल विकण्याचे बंधन असते, आणि त्यामध्ये मालाला हवा तो भाव मिळत नाही.

“उधारीवर खतं-बियाणं घेतली की त्यासाठी जास्तीचे पैसे द्यावे लागतात. रोख पैसे दिले तर जो माल ५००० रू.ला मिळेल त्याला ५५०० ते ६००० रु द्यावे लागतात. आणि वर दोन टक्के व्याज. पण काय करणार,” यवतमाळ मधील वनिताने सांगितले.

३८ टक्के महिलांनी सांगितले की त्यांना आवश्यक त्या निविष्ठा उधारीवर मिळाल्या नाहीत. तर २२ टक्के महिलांना त्यासाठी सोने गहाण ठेवावे लागले. अनेक चर्चांमध्ये महिलांनी हे मांडले आहे की त्यांचे सोन्याचे दागिने हे त्यांना कधी घालायला मिळतच नाहीत, त्यांचा उपयोग हा अडचणीच्या वेळी गहाण ठेवण्यासाठीच असतो. एकट्या महिलांना निविष्ठा मिळविण्यामध्ये विशेष अडचणी येतात. बाजारात जाऊन स्वतः खरेदी करणे त्यांना शक्य होत नाही, आणि कुटुंबातील इतर पुरुषांवर त्यासाठी अवलंबून रहावे लागते.

अकोल्यामधील ८५ टक्के आणि यवतमाळमधील ७६ टक्के महिलांनी त्यांनी त्यांच्या मुख्य पीकाची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जाऊन केल्याचे सांगितले. परंतु परभणीमध्ये ७१ टक्के महिलांनी त्यांच्या पीकाची विक्री खाजगी व्यापाऱ्यांना केली. विक्री करताना योग्य भाव मिळण्यामध्ये असणाऱ्या अनेक अडचणी महिलांनी सांगितल्या त्यामध्ये माल साठवायला जागा नाही (७१ टक्के), किंवा ताबडतोब पैशांची गरज आहे म्हणून कमी किंमतीला माल विकायला लागणे (८० टक्के), गावाबाहेर माल विकायला जाता येणे शक्य नसणे (२८ टक्के), जमीन नावावर नसल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल विकता न येणे (२८ टक्के) ह्या प्रमुख गोष्टींचा समावेश होता.

“मुलाच्या फी साठी पैसे पाहिजे होते, त्यामुळे त्यादिवशी मिळेल त्या भावाला होता तो कापूस विकून टाकला. तो ओला आहे अस म्हणून व्यापाऱ्याने भाव अजूनच कमी केला,” यवतमाळ मधील उषाने सांगितले.

मालाच्या विक्रीमध्ये महिलांचा सहभाग अतिशय कमी होता. केवळ तीन टक्के महिलांनी त्या स्वतः बाजारात विक्रीसाठी जात असल्याचे सांगितले. इतर कुटुंबांमध्ये हे काम पुरुष सांभाळत होते. बाजारामध्ये महिलांच्या वावरावर असलेल्या बंधनांमुळे एकट्या महिलांना विशेष अडचण येते, आणि विक्रीसाठी कुटुंबातील पुरुषांवर अवलंबून रहावे लागते.

**मजुरांची उपलब्धता**

शेती करणाऱ्या  बहुतेक महिला ह्या सीमांत आणि छोट्या शेतकरी कुटुंबातील होत्या. अनेकजणी स्वतः मजुरी करणाऱ्या देखील होत्या. त्याचबरोबर त्यांना स्वतःच्या शेतात काम करण्यासाठी मजूर लावणे देखील गरजेचे होते. एकूण शेती करणाऱ्या महिलांपैकी एकूण ८७ टक्के महिलांनी त्या शेतीतील कामासाठी मजूर लावत असल्याचे सांगितले. ह्यामध्ये जिल्हावार फरक दिसून आले. हे प्रमाण परभणी जिल्ह्यात (५७ टक्के) अकोला (९३ टक्के) आणि यवतमाळ (९५ टक्के) जिल्ह्याच्या तुलनेत बऱ्याच प्रमाणात कमी होते. ७५ टक्के महिलांनी त्यांना आवश्यक तेवढे मजूर कामावर ठेवणे परवडले नाही असे सांगितले. तर ७५ टक्के महिलांनी पुरेसे मजूर न  मिळाल्याने स्वतःला कामाचे ओझे उचलायला लागले असे सांगितले.

एकट्या महिलांना पुरुष मजुरांकडून काम करून घेणे फार कठीण जाते असे त्यांच्याशी केलेल्या चर्चांमधून लक्षात आले. "मला त्यांना फवारणीसाठी सारख्या सूचना द्याव्या लागतात. पुरेशी फवारणी करत नाहीत. लक्ष ठेवायला पुरुष माणूस असतं तर त्यांनी नीट काम केलं असतं. पण हे अर्धवट फवारणी करून निघून जातात अकोला  मधील अनिताने सांगितले.

एकट्या महिला शेतकऱ्यांना विशेषतः शेतीची कामे ज्यावेळी वेळेवर होणे गरजेचे असते अशा वेळी मजूर मिळविणे कठीण जाते. उदाहरणार्थ नांगरणी-पेरणी, खते देणे, फवारणी अशी कामे गावामध्ये सर्व शेतकऱ्यांची एका वेळेला चालू असतात, अशा वेळी मजूर एकट्या महिलांना प्राधान्य देत नाहीत. तसेच पुरुष मजुरांना बोलावताना महिलांना अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. "हार्वेस्टर गावाबाहेरून बोलवावा लागतो. गडी माणसं ड्रायव्हर चा नंबर घेऊन त्याला फोन करून बोलवून घेऊ शकतात. पण एकट्या बाया आपल्या फोन वरून असा कोणाला पण फोन नाही ना लावू शकत. आपण तो हार्वेस्टर आपल्या आजूबाजूच्या शेतात येई पर्यंत वाट पहायची आणि मग त्याला काम सांगायचं," यवतमाळमधील  वर्षाने सांगितले. परभणी मधील शोभा  म्हणाली, "पुरुष मजुरांकडून काम करून घेतल की ते रात्री-अपरात्री कधी पण पैसे मागायला घरी येतात. त्यासाठी मी सावकाराकडून उधार घेऊन ठेवते, आणि लगेच त्यांना पैसे देऊन टाकते." एकट्या महिलांना हिंसाचाराची अशी सततची भीती असल्याने त्यांच्या शेतीमधील कामे करून घेण्यावर मर्यादा येतात.

**जमीन मक्त्याने देणे घेणे**

सर्वे मधील एकूण महिलांपैकी आठ टक्के महिलांनी २०२२-२३ मध्ये जमीन मक्त्याने घेतली होती. जमीन मक्त्याने घेणाऱ्या महिलांचे प्रमाण यवतमाळमध्ये (१५ टक्के) अकोला आणि परभणी जिल्ह्याच्या (प्रत्येकी तीन टक्के) तुलनेत अधिक होते. मक्त्याने शेती घेणाऱ्या १०६ महिलांपैकी ३८ टक्के महिला भूमिहीन तर ६२ टक्के महिला भूधारक कुटुंबातील होत्या. मक्त्याने घेणाऱ्या महिलांचे प्रमाण हे विवाहित महिलांमध्ये नऊ टक्के तर विधवा महिलांमध्ये चार टक्के होते.

स्वतःची जमीन मक्त्याने देणाऱ्या महिलांचे प्रमाण भूधारक कुटुंबांतील महिलांच्या १२ टक्के होते. जमीन मक्त्याने देणाऱ्या महिलांनी त्यामागे कसण्यासाठी पुरेसे भांडवल नसणे, सिंचनाच्या सोयी नसणे, पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसणे अशी कारणे सांगितली.

एकट्या महिलांशी केलेल्या चर्चांमधून जमीन कसण्यासाठी पुरेसे भांडवल नसणे, मजुरांचे सहकार्य नसणे, कुटुंबांचा आधार नसणे ह्यामुळे अनेक एकट्या महिलांना शेती मक्त्याने देऊन टाकावी लागते. अकोला  मधील ज्योत्सना ने सांगितले, "मी आधी स्वतः शेती करत होते, पण फार त्रास होता. फवारणीला लोक मिळायचे नाहीत. ट्रॅक्टरवाला त्याच्या सोयीने यायचा. माझ्या घरी कोणी नाही म्हणून दुकानदार बियाणाचे पैसे जास्त लावायचा."

"दोन लोकांना प्रत्येकी ३०० रू दिले तरी त्यांनी अर्धा  दिवसंच काम केलं. बऱ्याचदा ते दारू पिऊन पण येतात. त्यामुळ मी शेती दुसऱ्याला करायला देऊन टाकली," यवतमाळमधील सारिकाने सांगितलं.

“फवारणाऱ्याच्या पाठीवर १५ लिटरचा पंप असतो. तो घेऊन त्यांना उठता आले नाही की त्यांना हात द्यायला लागतो. ते लेडीज बघून पुढं ओढतात. मग आपण काय करायचं? त्यामुळे स्वतःची शेती करणं लई अवघड होऊ जातं. म्हणून मग शेती देऊन टाकली वाहायला.” हे परभणी मधील अलकाचे काही अनुभव.

जमीन कसणे हे काही महिलांना अवघड जात असले तरी काही महिलांना त्यामध्ये फायदा दिसत असल्याने त्या जमीन मक्त्याने घेतात. जमीन मक्त्याने घेणाऱ्या महिलांना त्यामागची कारणे विचारली असता जमीन नाही किंवा पुरेशी नाही हे सगळ्यात महत्वाचे कारण समोर आले. त्याचबरोबर खाण्यासाठी अन्नधान्य मिळविण्यासाठी जमीन मक्त्याने घेतात असेही अनेक महिलांनी सांगितले.

“समजा आपण कोणाच्या वावरात गेलो, आणि तिथे चार शेंगा तोडल्या तर मालक बोलतो. पण हे कसं आपलं हक्काचं शेत आहे. आपल्याला कोणी काही म्हणणार नाही. आपल्या खाण्यासाठी डाळ घेऊ शकतो. आपल्याला आपल्या हक्काचं खायला भेटतंय,” यवतमाळमधील वैशाली ने सांगितले. जमीन मक्त्याने घेऊन महिला ती कसत असल्या तरी त्यामध्ये अनेक अडचणी आहेत. शेती नावावर नसल्याने त्यांना पीएम किसान सारख्या योजना, किंवा पीक विम्याची नुकसानभरपाई ह्यांचा लाभ तर मिळत नाहीच, उलट पीकाचे नुकसान झाले तरीही ठरलेली रक्कम शेत मालकाला द्यावीच लागते.

### शेतीमधील गुंतवणूक आणि सरकारी योजनांचा लाभ

शेती कसणाऱ्या महिलांपैकी २० टक्के महिलांनी (१२१) मागील तीन वर्षांत त्यांनी त्यांच्या शेतात काही गुंतवणूक केली असल्याचे सांगितले. ही गुंतवणूक प्रामुख्याने सिंचनाच्या सोयी करण्यासाठी किंवा पाणी संवर्धनाची कामे करण्यासाठी केलेली होती. त्यापैकी केवळ ११ टक्के (१३) महिलांना त्यासाठी सरकारी योजनेतून सहाय्य मिळाले, इतर सर्वांनी गुंतवणूक स्वतःच्या खर्चाने केली.

शेतीसाठी कोणत्या सरकारी योजनांचा लाभ मिळतो का हे पाहिले असता २३ टक्के महिलांनी पीक विमा आणि एक टक्का महिलांनी किसान क्रेडीट योजनांचा लाभ मिळत असल्याचे सांगितले. पीएम किसान सन्मान योजना ही भारत सरकारची मोठी योजना आहे. पूर्वी केवळ एक हेक्टरपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत असे, पण आता ती अट देखील काढून टाकण्यात आलेली आहे. असे असले तरी सर्वे मधील केवळ १८ टक्के भूधारक महिलांनी त्यांना ह्या योजनेचा लाभ मिळत असल्याचे सांगितले.

थोडक्यात म्हणजे प्रभावीपणे शेती करून त्यामधून आर्थिक फायदा मिळविण्यामध्ये महिला शेतकऱ्यांना अनेक अडचणी आहेत. त्यांना व्यापारी, सावकार, पुरुष मजूर, कुटुंबातील सदस्य अशा विविध पातळ्यांवर प्रश्नांना सामोरे जावे लागते. आर्थिक अडचणींमुळे संसाधने गहाण ठेवून निविष्ठा मिळवायला लागतात. शेतीच्या कामांमध्ये कुटुंबातील पुरुषांचा पुरेसा सहभाग नसल्याने कामाचे अतिरिक्त ओझे उचलावे लागते. मजुरी देणे न परवडल्याने स्वतः अधिक काम करावे लागते. त्यांचा बाजारपेठेचा मार्ग सोपा नाही, आणि योग्य भाव मिळविण्यामध्ये अनेक अडचणी आहेत. ह्या सर्व मर्यादांचा एकत्रित परिणाम त्यांची कार्यक्षमता आणि शेती फायद्याची करण्याची शक्यता ह्यांच्यावर होतो. कुटुंबाच्या गरजा भागवून आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी त्यांना सतत झगडा करावा लागतो.

## शेतमजूर महिलांचे प्रश्न

ह्या आधी दिलेल्या कोष्टक क्रमांक १५ मध्ये दाखविल्या प्रमाणे फक्त मजुरी करणाऱ्या आणि शेती आणि मजुरी दोन्ही करणाऱ्या अशा मिळून १०८१ महिला (सर्वे मधील एकूण महिलांच्या ७९ टक्के) महिला मजुरीच्या कामात गुंतलेल्या होत्या. ह्या भागामध्ये त्यांच्याकडून सर्वे मधून आलेली माहिती तसेच तपशीलातील आणि गटचर्चांमधून आलेली माहिती ह्या आधारे मजुरी करताना त्यांना येणाऱ्या अडचणी ह्याबद्दल मांडणी केली आहे.

### कामाची उपलब्धता

सर्वेमधील एकूण शेतमजुरी करणाऱ्या महिलांपैकी ६५ टक्के महिलांनी मागील काही वर्षांत त्यांचे काम कमी झाले असल्याचे सांगितले. हे प्रमाण भूमिहीन महिलांसाठी ७० टक्के तर भूधारक कुटुंबातील महिलांसाठी ५५ टक्के होते. सर्वेमधून घेतलेल्या माहिती नुसार २०२२-२३ वर्षामध्ये मजुरी करणाऱ्या महिलांना सरासरी १२३ दिवसांचे काम मिळाले. पूर्णपणे मजुरीवर अवलंबून असणाऱ्या भूमिहीन महिलांनाही सरासरी १३४ दिवस एवढेच काम मिळाले.

महिलांना मिळणारी कामाची मजुरी ही दिवसाला २०० रू पेक्षा अधिक नाही. परंतु उक्त्याने घेतलेल्या कामांसाठी मजुरीचा दर हा कामाचे स्वरूप आणि सिझन प्रमाणे वेगवेगळा असलेला दिसतो.

कामाची उपलब्धता कमी झाली आहे हा मजुरांसाठी, विशेषतः भूमिहीन मजुरांसाठी मोठा प्रश्न आहे. मजुरीची कामे का कमी झाली आहेत हे विचारले असता वेगवेगळे मुद्दे समोर आले. तणनाशकांचा वाढलेला वापर आणि यांत्रिकीकरण ही दोन कारणे सर्वात प्रकर्षाने पुढे आली. पूर्वी जी काम महिला करत होत्या अशी कापणी सारखी कामे मोठ्या प्रमाणात मशीनने होत असल्याने त्यांना आता काम मिळत नाही. “पूर्वी इतर पिकं असायची त्यावेळी भरपूर काम रहायचं. आता सोयबीनमध्ये बायांना काम नाही. ते तणनाशक मारतात, आणि हार्वेस्टर ने कापणी करतात. मशीनच माणसाची सगळी कामं करतंय. मग आम्ही काय करायचं?”, अकोल्यातील सरिता ने सांगितले.

त्याशिवाय एकसुरी पीक पद्धतीमुळे काम कमी होते असे महिलांनी सांगितले. अभ्यासक्षेत्रामध्ये कापूस आणि सोयाबीन ही दोन मुख्य पिके होती. त्याशिवाय तूर सोडून इतर अन्नधान्याची पिके फारशी पिकवली जात नाहीत. अशा प्रकारच्या एकसुरी पीक पद्धतीमुळे काही ठराविक दिवसांमध्ये मजुरांची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण होते. उदाहरणार्थ सोयाबीनची कापणी करताना, किंवा कापूस वेचायच्या वेळी. परंतु वर्षातील इतर काळ मात्र काम उपलब्ध होत नाही.

ह्याशिवाय शेतकऱ्यांनादेखील आता मजुरी देणे परवडत नाही हे देखील महिलांनी सांगितले. उत्पादनाचा खर्च वाढलेला असल्याने मजुरांवर खर्च करण्याऐवजी शेतकरी तणनाशक मारणे किंवा यंत्राद्वारे कापणी करून घेणे पसंत करतात. त्यामुळे मजूर महिलांचे काम कमी होते.

### मजुरीचे पैसे मिळण्यामधील अडचणी

मजुरीचे पैसे मिळण्यामधील अनेक अडचणी महिलांनी सांगितल्या. ६३ टक्के महिलांनी सांगितले की त्यांना मजुरीचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. हे प्रमाण भूमिहीन महिलांमध्ये (६७ टक्के) भूधारक महिलांच्या (५५ टक्के) तुलनेत अधिक होते. ३६ टक्के महिलांनी असेही सांगितले की त्यांना ठरलेल्या कामापेक्षा अधिक काम त्यांच्याकडून करून घेतले जाते. असे सांगणाऱ्या महिलांचे प्रमाण परभणी मध्ये सर्वाधिक होते. परभणी जिल्ह्यात देखील इतर मागास वर्गीय महिलांच्या (५० टक्के) तुलनेत अनुसुचित जाती (८० टक्के), भटक्या जमाती (७४ टक्के) आणि सर्वसाधारण जाती (७२ टक्के)मध्ये हे प्रमाण अधिक होते. तसेच भूमिहीन महिलांमध्ये (४१ टक्के) हे प्रमाण भूधारक महिलांच्या तुलनेत (२८ टक्के) अधिक होते.

“गावात शुक्रवारी चुकारा निघतो, आणि सोयाबीन कापणीला किती पैसे द्यायचे ते शेतकरी ठरवतात. आधी आठवड्यात जास्त बोलीने काम केलं असलं तरी चुकाऱ्याच्या दिवशी भाव कमी झाला तर शेतकरी ठरलेला भाव देत नाहीत,” अकोल्यातील जयाने सांगितले. “आम्ही सहा जणींनी गहू काढायचा हुंडा घेतला. एक बॅग गहू काढला (म्हणजे साधारण एक एकर) पण आम्हांला प्रत्येकीला त्यासाठी फक्त ४ किलो गहू मिळाला,” अकोल्यामधील सरिता ने तिचा अनुभव सांगितला.

कामाची अनुपलब्धता आणि त्याच्या बदल्यात मिळणारा तुटपुंजा मोबदला ह्यामुळे महिलांना रोजच्या गरजांसाठी सतत उधार पैसे घ्यावे लागतात. बऱ्याचदा ज्यांच्या शेतात मजुरीला जातात अशा शेतकऱ्यांकडून महिला उधारीवर पैसे घेतात, आणि नंतर मजुरी करून ते फेडतात. अशाप्रकारे उधारीने मजुरीचे पैसे घेणाऱ्या महिलांचे प्रमाण भूमिहीन महिलांमध्ये (६४ टक्के) भूधारक महिलांच्या (५४ टक्के) तुलनेत अधिक होते. अशा प्रकारे उधार घेणाऱ्या महिलांपैकी ५८ टक्के महिलांनी सांगिले की अशा प्रकारे उधार घेतल्यावर त्यांना त्या बदल्यात इतर वेळी केले असते त्यापेक्षा अधिक काम करावे लागते.

मजुरी वेळेवर न मिळाल्यास महिलांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण येतो. त्यांच्या अन्न, आरोग्य ह्यासारख्या रोजच्या गरजा भागविण्यासाठी आठवड्याला मिळणाऱ्या मजुरीवर अवलंबून असणाऱ्या महिलांची परिस्थिती त्यामुळे बिकट होते.

**रोजगार हमीचे अपयश**

मनरेगा सुरू होण्यापूर्वी कितीतरी आधी १९७७ मध्ये महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी कायदा करून ग्रामीण भागातील लोकांना वर्षभर काम देण्याची तरतूद केलेली होती. १९७२-७३ मध्ये झालेल्या मोठ्या दुष्काळासाठी तो प्रतिसाद होता. २००५ मध्ये लागू झालेल्या मनरेगा कायद्याने राष्ट्रीय पातळीवर ग्रामीण भागातील लोकांना १०० दिवसांचे काम मिळण्याची तरतूद केलेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात जेव्हा शेतीची कामे उपलब्ध नसतील त्यावेळी मजुरीवर अवलंबून असणाऱ्या लोकांना काम मिळेल अशी अपेक्षा आहे. परंतु सर्वेमधून घेतलेल्या माहितीमधून त्यामध्ये हा उपक्रम कशा प्रकारे अपयशी झाला आहे हे स्पष्ट दिसून येते.

सर्वेमधील शेतमजुरी करणाऱ्या केवळ ३३ टक्के महिलांकडे जॉब कार्ड होती. भूधारक कुटुंबातील मजुरी करणाऱ्या महिलांमध्ये जॉब कार्ड असण्याचे प्रमाण (३८ टक्के) भूमिहीन महिलांच्या (३० टक्के) तुलनेत थोडे अधिक होते. जाती प्रमाणे जॉब कार्ड असण्याचे प्रमाण पहिले तर अनुसूचित जमातीमध्ये (४७ टक्के) हे प्रमाण सर्वात जास्त तर सर्वसाधारण जातींमध्ये हे प्रमाण सर्वात कमी (१३ टक्के) होते.

एकूण मजुरी करणाऱ्या महिलांपैकी फक्त ३ टक्के महिलांना २०२२-२३ मध्ये रोजगार हमीमधून काम मिळाले.

**कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार**

मजुरीच्या कामाच्या ठिकाणी त्यांना येणारे विविध अनुभव महिलांनी सांगितले. सर्वेमधील ४१ टक्के महिलांनी कामाच्या ठिकाणी त्यांना शाब्दिक हिंसाचार सहन करावा लागतो असे सांगितले. अकोला जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात जास्त (६२ टक्के) होते. तसेच एकूण महिलांमध्ये अनुसूचित जाती आणि विमुक्त जमातीच्या महिलांमध्ये हे प्रमाण सर्वात जात होते. त्याचबरोबर जातीवाचक टिपणी (२८ टक्के) आणि कामाच्या ठिकाणी होणारा भेदभाव (३४ टक्के) हे प्रश्नही महिलांनी मांडले.

अकोला जिल्ह्यातील पारधी जातीमधील महिलांनी जातीमुळे त्यांना ठराविक प्रकारची कामे, उदाहरणार्थ भाजी तोडणे, कशी नाकारली जातात ते सांगितले. “सोयाबीन मशीनने काढले की शेतकरी सरवा (शिल्लक राहिलेले सोयाबीन) वेचायला मजूर लावतात. गोळा केलेल्या सोयाबीनमधला अर्धा भाग शेतकऱ्याचा आणि अर्धा मजुराचा असे ठरलेले असते. पण आमच्याकडून मात्र आमच्या हिस्स्यातला पण काढून घेतात,” अकोल्यामधील मंगल ने सांगितले.

“माझा नवरा गेल्यावर बरेच महिने मी घरीच होते. ज्या दिवशी पहिल्यांदा कामाला जायला बाहेर पडले तशी शेजारच्या एका माणसाने काही बाही बोलायला सुरुवात केली. माझ्या बरोबर माझ्या घरातलं कुत्रं होतं, तर मला म्हणाला की त्याला कशाला घेऊन जाते बरोबर, मी येतो की. मी घाबरून परत घरी गेले. पुन्हा कितीतरी दिवस घराबाहेर पडायची मला हिंमत झाली नाही,” यवतमाळमधील अर्चनाने तिचा अनुभव सांगितला.

स्थलांतरीत कामगार महिलांना, विशेषतः ऊसतोड कामगार महिलांना कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात हिंसाचाराचा सामना करावा लागतो. ऊसतोड कामगार महिलांबरोबर आम्ही केलेल्या अभ्यासांमध्ये कामाच्या ठिकाणी गेल्यावर त्यांच्यावर वाढणारा घरगुती हिंसाचार, आणि त्याच बरोबर कामाच्या ठिकाणचा हिंसाचार आणि असुरक्षित वातावरण ह्याचा सामना त्यांना कसा करावा लागतो हे अधोरेखित होते.

अशा प्रकारच्या अनुभवांमुळे मजुरी करणाऱ्या महिलांसाठी कामाच्या ठिकाणी असुरक्षित वातावरण निर्माण होते. त्याचा परिणाम त्यांच्या आत्मसन्मानावर तर होतोच परंतु त्यामुळे भीतीची आणि हतबलतेची भावना वाढीस लागते. त्याचा परिणाम मानसिक आरोग्यावर होऊ शकतो. तसेच त्यांच्या काम करण्याच्या क्षमतेवर आणि अर्थार्जनावर त्याचा परिणाम होतो.

**कामाच्या अनुपलब्धते वरचे उपाय**

गावामध्ये कामाच्या संधी कमी झाल्याने वर्षभर महिलांना त्यासाठी इतर पर्याय शोधावे लागतात. वर म्हटल्याप्रमाणे कापूस आणि सोयाबीन पिकांचे प्रमाणच मोठे असल्याने सोयाबीनची कापणी, कापसाची वेचणी ह्या काळात गावात काम उपलब्ध असते. परंतु इतर वेळी काम मिळविण्यासाठी महिलांना शोधाशोध करावी लागते. अशा वेळी महीला उक्त्याने मजुरीची कामे घेतात. उक्त्याने घेतलेली कामे कमी वेळेत पूर्ण करण्यासाठी महिला त्यांचे कामाचे तास वाढवतात. हे अतिरिक्त कष्ट केल्याचा परिणाम अनेकदा त्यांच्या आरोग्यावर होतो. आजारपण फार गंभीर असल्याशिवाय उपचार घेण्याचे देखील त्या टाळतात.

“दहा बायांना सोयाबीनची एक बॅग काढायला एक दिवस लागतो (साधारण एक एकरवरचे सोयाबीन). त्यासाठी २८०० ते ३००० रुपयापर्यंत पैसे मिळतात. आम्ही सकाळी पाचला कामाला सुरूवात करतो ते दुपारी उशिरापर्यंत काम करतो. अशा कामांनंतर बऱ्याचदा बायका आजारी पडतात,” अकोल्यामधील मनिषाने सांगितले. रोजच्या मजुरीपेक्षा थोडे अधिक पैसे मिळतात, आणि शेतकऱ्यांना ते थोडे परवडत असल्याने त्यांची अशी कामे देण्याची तयारी असते, म्हणून मजूर महिला अशा प्रकारची कामे घेतात. त्याचबरोबर ट्रॅक्टरच्या मागे चालून उरलेला काडी -कचरा उचलणे इत्यादी छोटी कामेही महिला करतात.

सर्वे मधल्या २९ टक्के महिलांनी २०२२-२३ मध्ये त्यांनी उख्त्याने काम घेतल्याचे सांगितले. हे प्रमाण भूमिहीन मजूर महिलांमध्ये (३१ टक्के) भूधारक महिलांच्या (२६ टक्के) तुलनेत थोडे अधिक होते.

पैशांच्या बरोबरीने अनेकदा कुटुंबासाठी धान्य आणि भाजीपाला मिळविण्यासाठी देखील महिला उख्त्याने कामे घेतात. विशेषतः परभणी जिल्ह्यात अशी कामे करणाऱ्या महिलांनी त्यांना त्या बदल्यात रोख पैशांच्या बरोबरीने धान्य किंवा चारा आणि जळण मिळत असल्याचे सांगितले. “हरभरा सोंगायला लई त्रास होतो, हाताची खाज होते. पण घरी पोरांना हरभरा खायला मिळेल म्हणून ते काम घेतलं,” परभणी मधील छायाने सांगितले.

फेब्रुवारी नंतर जूनपर्यंतच्या काळात कोरडवाहू भागांमध्ये शेतीमध्ये फारशी कामे नसतात. त्यामध्ये रोजगार हमीची कामे पण मिळत नाहीत. तपशिलात घेतलेल्या मुलाखतींमधून त्या ह्या परिस्थितीमध्ये काय करतात ह्याबद्दल माहिती घेण्याचा प्रयत्न केला. “जिथे काम मिळेल तिथे मी जाते. मी एकटी माझ्या पोरांना सांभाळते. काम नाही केलं तर त्यांना खायला कोण

घालणार? काम नाही मिळालं तर गावात फिरून कोणाकडे काम आहे का विचारते," परभणी मधील इरफानाने सांगितले. "उन्हाळ्यात मी बोरं विकते. आधी सिझन मध्ये गोळा करून वाळवून ठेवायची. मग उन्हाळ्यात काम नाही मिळालं की त्यामध्ये मीठ-साखर घालून माझ्या मुलाकडे विकायला देते. तो गावात फिरून ती विकतो. एका ग्लासाला एक रुपया असे दिवसाला ३०-४० रुपये निघतात. बाकीची नाही विकली गेली तर वाया जातात, मग दुसऱ्या दिवशी नवीन बनवायची."

"उन्हाळ्यात काम कमी राहतं. मग एका बाईला काम लागलं तर ती बरोबरच्या आणखी दोघींना घेऊन जाते, आणि एकाला मिळालेली मजुरी त्या वाटून घेतात. बायका अशी एकमेकींना मदत करतात, निदान रात्री खायला मिळेल असं बघतात," अकोला मधील अलकाने सांगितले.

ज्या गावात सिंचनाच्या सोयी उपलब्ध नाहीत त्या गावातील महिला उन्हाळ्यात आजूबाजूच्या गावांमध्ये कामासाठी जातात. १०-१५ किमी च्या परिसरात रोज ह्या महिला कामासाठी जातात. गाव लांब असेल तर शेतकरी त्यांच्या येण्या जाण्याची सोय करतात नाही तर जवळ असेल तर त्या चालत जातात. गहू, ज्वारी, हळद ह्यासारख्या पिकांची कापणी अशी ही कामे असतात. हा सगळा भाग बहुतेक कोरडवाहू असल्याने ही कामे देखील फार मिळत नाहीत. त्यामुळे काही महिला ज्याठिकाणी कामे आहेत अशा भागांमध्ये स्थलांतर करूनही जातात. त्यामध्ये ऊस, कांदे, मिरच्या अशा पिकांच्या तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्र किंवा तेलंगणामध्ये कामासाठी जाणाऱ्या महिलाही अनेक आहेत.

## रोजगारासाठी स्थलांतर

सर्वेमध्ये सहभागी झालेल्या एकूण महिलांपैकी ३ टक्के महिला रोजगारासाठी वर्षातील काही काळ स्थलांतर करून जात होत्या. ह्यापैकी बहुतेक महिला परभणी जिल्ह्यातील असून, ऊसतोडीच्या कामासाठी जाणाऱ्या होत्या. इतर मागासवर्गीय जाती आणि अनुसूचित जमाती ह्यांच्या व्यतिरिक्त इतर जातींमध्ये स्थलांतर करून जाण्याचे प्रमाण अधिक होते. अनुसूचित जातींमध्ये ते तुलनेने सर्वात जास्त (सात टक्के) होते. एकूण भूमिहीन कुटुंबांपैकी पाच टक्के महिला स्थलांतर करून जात होत्या. सीमांत शेतकऱ्यांमध्ये हे प्रमाण दोन टक्के होते. अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यातून स्थलांतर करून जाणाऱ्या महिलांची संख्या अनुक्रमे सहा आणि तीन अशी होती. ह्या महिला प्रामुख्याने वीटभट्टीवर कामासाठी जात होत्या.

परभणीमधील ज्या ३३ महिला स्थलांतर करून जात होत्या त्यापैकी २९ महिलांनी कामासाठी उचल घेतली होती. आणि सर्वेच्या वेळी त्यापैकी फक्त सात महिलांनी त्यांनी घेलेली उचल फिटल्याचे सांगितले. इतर २२ महिलांची उचल फिटली नसल्याने त्यांना पुढच्या वर्षी परत त्याच कामाला जाणे भाग होते. मालकीची जमीन नाही, गावात शेतीची कामे नाहीत, रोजगार हमीची कामे नाहीत त्यामुळे स्थलांतर करून जावे लागते असे महिलांनी सांगितले. त्याचबरोबर मोठ्या रकमेची गरज असल्यास कामासाठी उचल घेऊन ती पूर्ण होत असल्याने देखील महिला ही कामे घेतात. परभणी जिल्ह्यातील महिलांचा स्थलांतराचा सरासरी काळ हा ७ ते ८ महिन्यांचा होता. सर्व महिलांनी स्थलांतर करून गेलेल्या कामाच्या ठिकाणी घर, स्वच्छता आणि आरोग्याच्या सुविधा नसल्याचे सांगितले. स्थलांतर करणाऱ्या महिलांपैकी ९४ टक्के महिला म्हणाल्या की ह्या काळात त्यांना कोणतीही रजा न घेता काम करावे लागते. सर्व महिलांनी कामाच्या ठिकाणी त्यांना जास्तीचे काम सांगितले जात असल्याचे सांगितले. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी शाब्दिक हिंसाचार (६१ टक्के), भविष्यात काम न देण्याची धमकी (४९ टक्के) आणि जातीवाचक टिपणी (२१ टक्के) असे अनुभव येत असल्याचे महिलांनी सांगितले.

मजुरी करणाऱ्या महिलांचे प्रश्न विविधांगी आहेत. पुरेसे काम नाही, कामाचा मोबदला पुरेसा आणि वेळेवर मिळत नाही ह्यामुळे त्यांना आर्थिक स्थैर्य मिळू शकत नाही. शेतीच्या पद्धतींमुळे त्यांच्या उपजीविकेच्या संधी आणखीनच कमी होऊन जातात. तसेच रोजगार हमीमधून काम मिळत नसल्याने त्यांचा संघर्ष आणखीनच वाढतो. घरामध्ये आणि कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार ह्यामुळे त्यांच्या काम करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो.

## कर्जाचे ओझे

“इथे ज्याच्यावर कर्ज नाही असं तुम्हाला कोणीच नाही सापडणार. त्याशिवाय शक्यच नाही. कर्ज पूर्ण फिटलंय असं कधी होतच नाही. जात्यावर दळल्यासारखं ते चक्र चालूच राहतं,” यवतमाळमधील शैलाने सांगितले.

सर्वेच्या वेळी एकूण महिलांपैकी ७३ टक्के (९९५) महिलांनी त्यांच्या कुटुंबावर काही न काही कर्ज आहे असे सांगितले. ज्यांच्यावर कर्ज आहे अशा महिलांचे प्रमाण यवतमाळ मध्ये ८१ टक्के , अकोल्यामध्ये ७८ टक्के तर परभणी मध्ये ५२ टक्के होते. एकूण कुटुंबांमध्ये सर्वसाधारण जाती (६० टक्के) आणि भटक्या जमाती (६३ टक्के) ह्यांच्यामध्ये कर्जाचे प्रमाण सर्वात कमी तर अनुसूचित जमाती (८१ टक्के), विशेष मागास वर्गीय (८० टक्के) आणि इतर मागास वर्गीय (७९ टक्के) कुटुंबांमध्ये हे प्रमाण अधिक होते. अनुसूचित जातीच्या कुटुंबांमध्ये हे प्रमाण ७१ टक्के होते.

ज्या महिलांनी त्यांच्यावर सध्या कोणतेना कोणते कर्ज आहे असे सांगितले ते त्यांनी कशासाठी आणि कोठून कर्ज घेतले होते ह्याबद्दल माहिती घेतली.

**कोष्टक २० – सध्या घेतलेल्या कर्जांचे उद्देश** (जिल्ह्यामधील टक्केवारी)

| | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| शेती | 132 (30.4) | 54 (35.0) | 263 (64.4) | 515 (51.7) |
| मालमत्ता/ साधने घेण्यासाठी | 78 (18.0) | 4 (2.6) | 14 (3.4) | 117 (11.7) |
| लग्नासाठी | 18 (4.2) | 21 (13.6) | 44 (10.8) | 101 (10.1) |
| इतर घरगुती गोष्टींसाठी | 179 (41.3) | 40 (25.9) | 93 (22.8) | 379 (38.1) |
| इतर उपजीविकेसाठी | 15 (3.5) | 3 (1.9) | 6 (1.5) | 29 (2.9) |
| आरोग्यासाठी | 42 (9.7) | 36 (23.4) | 91 (22.3) | 202 (20.3) |
| रोजच्या गरजांसाठी | 105 (24.2) | 4 (2.6) | 22 (5.4) | 158 (15.8) |
| एकूण | 433 | 154 | 408 | 995 |

सर्वात जास्त कर्ज (५७ टक्के) ही शेतीसाठी घेण्यात आलेली होती. हे प्रमाण इतर दोन जिल्ह्यांपेक्षा यवतमाळ जिल्ह्यात अधिक होते. ३८ टक्के महिलांनी इतर घरगुती गोष्टींसाठी कर्ज घेतल्याचे सांगितले ज्यामध्ये मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेल्या कर्जांचाही समावेश होता. आरोग्यावरील खर्चासाठी २० टक्के महिलांनी कर्ज घेतली होती. त्याचबरोबर १५ टक्के महिलांना रोजच्या गरजांसाठी कर्ज घेणे भाग पडले होते.

जातीप्रमाणे कर्ज घेण्याची कारणे बघितली तर सर्वसाधारण जाती आणि इतर मागासवर्गीय कुटुंबांमध्ये शेतीसाठी घेतलेली कर्ज अधिक होती तर अनुसूचित जातींमध्ये घरगुती कारणांसाठी घेतलेल्या कर्जांचे प्रमाण अधिक होते.

“मजुरी पुरेशी मिळत नाही, म्हणून रोजचा खर्च पण कर्ज काढूनच करावा लागतो. अशा कर्जांवर महिना शेकडा ५ ते २५ मध्ये कितीही व्याज पडू शकतं,” अकोल्यामधील सुशीलाने सांगितले.

ह्याशिवाय नवऱ्याचे दारूचे व्यसन सोडविण्यासाठी, घरकुल पेन्शन, रेशन सारख्या सरकारी योजना मिळविण्यासाठी एजंटना द्यायला अशा कारणांसाठीही महिलांना कर्ज काढावे लागते.

"माझी जमीन मक्त्याने देऊन टाकली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या गोष्टींसाठी कर्ज काढावीच लागतात. सध्या माझ्यावर पन्नास हजारचं कर्ज आहे. मुलाला होस्टेलला ठेवलं त्यासाठी सावकाराचं कर्ज घेतलं. रोजच्या गोष्टींसाठी नातेवाईकांकडून कर्ज घेतलं आहे. एवढ्यात वीजेचं बील भरण्यासाठी पण घेतलं आहे," अकोल्या मधल्या छायाने सांगितले.

**कर्जाचे स्त्रोत**

शेतीसाठी घेतलेल्या कर्जांपैकी ४६ टक्के कर्ज ही बँकेकडून घेतली होती. त्याचबरोबर बचतगटातून १९ टक्के, सावकाराकडून १५ टक्के, आणि मायक्रोफायनान्स मधून ९ टक्के महिलांनी शेतीसाठी कर्ज घेतली होती. शेतीशिवायच्या इतर कर्जांसाठी महिला प्रामुख्याने अधिक व्याजदर घेणाऱ्या स्त्रोतांवर अवलंबून होत्या. साधने/मालमत्ता घेण्यासाठी सर्वाधिक कर्जे (५६ टक्के) मायक्रोफायनान्समधून घेतलेली होती. त्याशिवाय आरोग्य, इतर घरगुती गोष्टी, आणि इतर उपजीविकेच्या गोष्टी आणि लग्न ह्यासाठी २५ ते ३० टक्क्यांपर्यंत कर्ज ही मायक्रोफायनान्समधून घेतलेली होती. रोजच्या गरजांसाठी महिला प्रामुख्याने नातेवाईकांकडून व्याजाने कर्ज घेत होत्या असे दिसले.

**कर्ज घेण्यामधील अनुभव**

सर्वेमधील ७२ टक्के महिलांनी सांगितले त्यांना रोजच्या गरजांसाठी स्थानिक दुकानदारांकडून उधारीवर सामान आणावे लागते. इतर अनुभवांमध्ये पुरेसे उत्पन्न नसल्याने कर्ज फेडणे शक्य होत नसणे (५१ टक्के), कर्ज फेडण्यासाठी लोकांनी तगादा लावणे (५० टक्के) बँकेकडून कर्ज न मिळणे (२४ टक्के) आणि आधीच्या कर्जाची परतफेड केल्याशिवाय नवीन कर्ज न मिळणे (२९ टक्के) हे अनुभव प्रामुख्याने समोर आले.

एप्रिल-मे ह्या काळामध्ये काम मिळण्याचे प्रमाण कमी झाले असल्याने कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले . पिके आणि मजुरीच्या कामातून पुरेसे उत्पन्न मिळत नसल्यामुळे महिलांना अनेक गोष्टींसाठी कर्जावर अवलंबून राहावे लागते. शेतकरी शेतीच्या कामांसाठी वर्षाच्या सुरुवातीला कर्ज घेतात, परंतु महिलांना घरगुती खर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजांसाठी देखील कर्ज घ्यावे लागते.

मायक्रोफायनान्स आणि सावकारांकडून कर्ज घेणे महिलांच्या असुरक्षिततेत भर टाकते. "काम कमी झाल्यामुळे आम्हाला कर्ज घ्यावे लागते. कधी कधी आम्ही 'सवाई ' ने कर्ज घेतो (२५% व्याजदर असलेले कर्ज). म्हणजे मी १० रुपये घेतले तर १२.५ रुपये परत करावे लागतात. कधी कधी एका वर्षात आम्ही फक्त व्याज भरू शकतो आणि मूळ रक्कम तशीच राहते. पुढच्या वर्षी व्याज दुप्पट होते" असे यवतमाळ मधील वनिताने सांगितले.

अकोला जिल्ह्यातील पारधी समुदायातील महिलांनी व्याजदर समजून घेऊन हिशोब ठेवण्यात त्यांना येणाऱ्या अडचणी सांगितल्या. नेमके किती व्याज झाले, किती शिल्लक राहिले हे लक्षात येत नाही, आणि सावकार सांगेल तेवढे पैसे त्या भरतात.

मायक्रोफायनान्सचे हप्ते वेळेवर भरण्याच्या दडपणामुळे महिलांवर मोठा मानसिक ताण येतो. "मी बेसिक (मायक्रोफायनान्स कंपनी) कडून १२,००० रुपये कर्ज घेतले होते. जेव्हा एजंट आठवड्याचा हफ्ता गोळा करण्यासाठी आला, तेव्हा माझ्याकडे पैसे नव्हते. पण तो काही हालला नाही आणि पैसे मिळेपर्यंत माझ्या घराबाहेर बसून राहिला. मला त्याच संध्याकाळी माझा कापूस स्वस्तात विकून हप्ता भरावा लागला," असे यवतमाळ येथील ज्योत्सनाने सांगितले.

"मायक्रोफायनान्समधून कर्ज घेणे एक  दुष्टचक्र आहे. जेव्हा तुम्ही कर्ज फेडता, तेव्हा एजंट तुम्हाला नवीन कर्ज घ्यायला लावतात. ते आम्हाला सांगतात की जर तुम्ही आत्ता कर्ज घेतले नाही तर तुम्हाला पुन्हा कर्ज मिळणार नाही. मग अशा महिला या चक्रात अडकतात," असे यवतमाळ मधील अर्चनाने  सांगितले.

कर्ज घेतलेल्या महिलांपैकी २९% महिलांनी त्यासाठी काहीतरी गहाण  ठेवल्याचेसांगितले . गहाण ठेवलेल्या महिलांपैकी ८ टक्के महिलांनी सोने गहाण ठेवले होते. सोने हे अनेकदा महिलांकडे असलेली एकमेव संपत्ती असते आणि ती घरगुती कर्जासाठी वारंवार वापरली जाते.





# भाग ४ : ग्रामीण महिलांचे स्वास्थ्य

ह्या भागामध्ये महिलांच्या स्वास्थ्याशी संबंधित आरोग्य, अन्न आणि पोषण सुरक्षा आणि त्यांच्यावर होणारा हिंसाचार ह्या तीन विषयांची चर्चा केली आहे.

## आरोग्याचे प्रश्न आणि आरोग्य सुविधा

"सोयाबीन काढणीच्या काळात मी बरीच कामं घेतली आणि पंधरा हजार रुपये कमावले. पण सकाळी सहा वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत काम केलं. नंतर मी आजारी पडले आणि उपचारांसाठी २५ हजार रुपये खर्च आला,"परभणीमधील मीनाने सांगितले.

महिलांच्या कामाचे स्वरूप अत्यंत कष्टाचे असल्याने त्याचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. एकसुरी पीक पद्धतीमुळे केवळ काही ठराविक काळ काम उपलब्ध असते, त्यामुळे विशेषतः त्या काळात महिला जास्तीची कामे घेतात ज्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

सर्वेमध्ये महिलांनी नोंदवलेल्या प्रमुख आरोग्य समस्यांमध्ये पाठदुखी, अंगदुखी, सांधेदुखी, डोकेदुखी आणि अशक्तपणा यांचा समावेश होता. काही गावांमध्ये कीटकनाशकांच्या संपर्कामुळे त्रास झाल्याचेही महिलांनी सांगितले. "कीटकनाशकं

वापरून माझे हात खराब झाले आहेत आणि डोळ्यांनाही त्रास होतो आहे," असे परभणीतील आशाने सांगितले.

मासिक पाळीदरम्यान जास्त रक्तस्राव आणि त्वचेच्या समस्या आहेत असे म्हणणाऱ्या महिलांचे प्रमाण परभणीमध्ये अधिक होते. तर अकोल्यामध्ये अधिक प्रमाणात महिलांनी मूळव्याधीचा त्रास असल्याचे सांगितले. एकूण महिलांपैकी ७१ टक्के महिलांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली होती. ४ टक्के महिलांनी गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया केली होती. NFHS-५ च्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रात हे प्रमाण ३ टक्के आहे. यवतमाळमध्ये इतर दोन जिल्ह्यांच्या तुलनेत हे प्रमाण अधिक होते.

**कोष्टक २१ – आरोग्याविषयीच्या समस्या** (समस्या आहे असे सांगणाऱ्या महिलांची जिल्ह्यामध्ये टक्केवारी)

| आरोग्याच्या समस्या | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| पाठ/कंबरदुखी | 523 (93.7) | 274 (92.3) | 487 (96.1) | 1284 (94.3) |
| डोकेदुखी | 432 (78.0) | 228 (76.8) | 398 (78.5) | 1061 (77.9) |
| अंगदुखी | 403 (72.2) | 246 (82.8) | 410 (80.9) | 1059 (77.8) |
| सांधेदुखी | 390 (69.9) | 127 (42.8) | 417 (82.2) | 934 (68.6) |
| अशक्तपणा | 289 (51.8) | 232 (78.1) | 332 (65.5) | 853 (62.6) |
| पाळीच्या काळात अधिक रक्तस्त्राव | 20 (3.6) | 93 (31.3) | 56 (11.0) | 169 (12.4) |
| बाळंतपणा नंतरच्या आरोग्याच्या समस्या | 76 (13.6) | 5 (1.7) | 7 (1.4) | 88 (6.5) |
| त्वचेचे विकार | 41 (7.3) | 61 (20.5) | 7 (1.4) | 109 (8.0) |
| मुळव्याध | 103 (48.5) | 63 (21.2) | 53 (10.5) | 219 (16.1) |
| रक्तदाब | 109 (19.5) | 40 (13.5) | 95 (18.7) | 244 (17.9) |
| डोळ्यांसंबंधी समस्या | 272 (48.7) | 70 (23.6) | 204 (40.2) | 546 (40.1) |
| ऐकू न येण्याच्या समस्या | 109 (19.5) | 54 (18.2) | 65 (12.8) | 228 (16.7) |
| दातांच्या समस्या | 188 (33.7) | 48 (16.2) | 104 (20.5) | 340 (25.0) |

सर्वे मधील महिलांनी मानसिक आरोग्याच्या समस्याही असल्याचे मोठ्या प्रमाणात सांगितले. "उन्हाळ्यात आमच्याकडे फारसं काम नसतं आणि कर्जाचं ओझं वाढतं. त्या वेळी मला खूप निराश वाटतं आणि रात्री झोप येत नाही," असे यवतमाळ मधील कविताने सांगितले. काम शोधण्याच्या चिंता, कुटुंबाची काळजी, मुलांच्या शिक्षणासाठीची धडपड आणि घरगुती हिंसाचारामुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अनेक महिलांनी चिडचिडेपणा, झोप न येणे आणि चिंता वाटणे अशा समस्या असल्याचे सांगितले. झोप न येणे, चिंता वाटणे आणि नैराश्य यांचे प्रमाण विधवा महिलांमध्ये (७१ टक्के, ७६ टक्के, आणि ३१ टक्के) तुलनेने विवाहित महिलांपेक्षा (५६ टक्के, ५७ टक्के, आणि १८ टक्के) अधिक होते.

**कोष्टक २२ – मानसिक आरोग्याविषयीच्या समस्या**

(समस्या आहे असे सांगणाऱ्या महिलांची जिल्ह्यामध्ये टक्केवारी)

| आरोग्याच्या समस्या | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| चिडचिड होणे | 330 (59.1) | 157 (52.9) | 351 (69.2) | 838 (61.5) |
| झोप न येणे | 347 (62.2) | 139 (46.8) | 316 (62.3) | 802 (58.9) |
| चिंता वाटणे | 333 (59.7) | 136 (45.8) | 354 (69.8) | 823 (60.4) |
| नैराश्य | 84 (15.1) | 23 (7.7) | 169 (33.3) | 276 (20.3) |
| एकूण | 558 | 297 | 507 | 1362 |


आरोग्यसेवांची उपलब्धता हा देखील महिलांसमोरचा मोठा प्रश्न आहे.

"आजारी असलं तरी, दवाखाना कुठं आहे? आणि जरी असला, तरी पैसे कुठं आहेत?" परभणी जिल्ह्यातील कमलाने सांगितले.

गेल्या दोन वर्षांत ३७ टक्के महिलांनी आरोग्यावर मोठा खर्च झाल्याचे सांगितले. खर्चाची सरासरी रक्कम ४० ते ५० हजार रुपये होती. यापैकी ९२ टक्के महिला खाजगी रुग्णालयात गेल्या, तर फक्त ८ टक्के महिलांनी सरकारी रुग्णालयांचा आधार घेतला. एकूण महिलांमध्ये मिळून केवळ आठ टक्के कुटुंबांना आयुष्मान भारत योजनेचा फायदा झाला आणि फक्त १० महिलांना (०.७%) प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा फायदा झाला. ह्या योजनेत गरोदर आणि स्तनदा मातांसाठी रोख लाभ देण्यात येतो. अनेक वर्ष सामाजिक संस्था-संघटनांनी प्रयत्न केल्या नंतर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत (२०१३) ही योजना सुरू करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात त्या योजनेची अंमलबजावणी नीट होत नाही असे दिसते आहे.


## अन्न आणि पोषण सुरक्षा

**तक्ता १ - सर्वेमधील महिलांचा आहार, टक्केवारी**




वरील तक्त्यामध्ये सर्वेमधील महिलांच्या आहाराच्या सवयी दाखवल्या आहेत. गहू आणि तांदूळ ह्या रोजच्या आहारातल्या दोन मुख्य गोष्टी आहेत. सुमारे ४१ टक्के महिलांच्या रोजच्या आहारात डाळी असतात. ह्यामध्ये भूधारक आणि भूमिहीन महिलांमध्ये फारसा फरक दिसून येत नाही. इतर पोषक अन्नपदार्थ जसे की भाज्या, फळे, दुग्धजन्य पदार्थ आणि मांस यांचे सेवन अत्यंत कमी आहे.

त्यांच्या आहारातील वेगवेगळ्या गोष्टींचे स्त्रोत काय आहेत हे पाहिले असता पुढील चित्र दिसून आले.




बहुतेक कुटुंबे अन्नधान्यासाठी बाजारावर अवलंबून आहेत. तांदूळ आणि गहू अनेकांना रेशनव्यवस्थेतून मिळत असला तरी त्याचे प्रमाणही कमी झाले आहे असे दिसते. पूर्वी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये सर्व शेतकऱ्यांना स्वस्त दरात रेशन द्यावे असे सरकारचे धोरण होते. २०२३ मध्ये महाराष्ट्र शासनाने रेशन पूर्ण बंद करून त्याऐवजी रोख रक्कम देण्याचा निर्णय घेतला होता. त्याबद्दल सध्या काय धोरण आहे ह्याबाबत सध्या स्पष्टता नाही. गटचर्चा आणि मुलाखतींमध्ये अनेक महिलांनी त्यांचे रेशन तर बंद झाले आहे पण रोख पैसे मिळत नाहीत असे सांगितले. काही महिलांनी त्यांचा रेशनचा कोटा कमी झाल्याचे सांगितले. “आम्हांला आधी माणशी दोन किलो गहू मिळत होता. आता एकच किलो मिळतो आहे. बाजारात घ्यायला गेलं की ३५ रु किलोने गहू घ्यावा लागतो. त्याची क्वालिटी पण चांगली नसते. कधी कधी परिस्थिती अशी असते की मरून जावं असं वाटतं,” अकोल्यातील छायाने मुलाखतीत म्हंटले.

“पाऊस नाही, ज्वारीचा भाव ६० रू किलो झाला आहे. गरीबाचं रेशन कमी केलं पण श्रीमंतांना काही फरक नाही. आम्ही काय खायचं?,” परभणी मधील सुमनबाई ने विचारले

गटचर्चा आणि मुलाखतींमध्ये महिलांनी पीक पद्धतींमध्ये झालेल्या बदलांचे कसे परिणाम झाले आहेत आहेत यावर चर्चा केली. कापूस आणि सोयाबीन अशी दोनच पीके आता घेतली जात असल्याने बाजारावरच अवलंबून रहावे लागत असल्याचे शेतकरी महिलांनी सांगितले. तर पूर्वी अन्नधान्य पिकवली जायची त्यावेळी मजुरीच्या बदल्यात धान्य मिळत असे ते आता बंद झाले असे मजुरी करणाऱ्या महिलांनी सांगितले.

"आता आम्हाला कोणतेही रेशन मिळत नाही, म्हणून आम्ही गव्हासाठी उक्त घेतो. पण गावात गहू करणारे शेतकरी फार कमी आहेत," अकोल्यातील सीमाने सांगितले.

## महिलांवर होणारा हिंसाचार

“आम्ही ऊसतोडीला गेलेलो असताना माझ्या नवऱ्याने मला तिथेच सोडून दिलं. आमच्या मुलाची कसलीच जबाबदारी त्यानं नंतर घेतली नाही. मी आई-वडिलांच्या घरी आले, पण भावाला ते आवडलं नाही. त्यामुळे तिथे पण त्रासच झाला,” परभणीमधील इरफानाने सांगितले.

वेगवेगळ्या प्रकारांनी महिलांवर होणारा हिंसाचार हा एक गंभीर प्रश्न आहे. NFHS-5 अहवालानुसार, ग्रामीण महाराष्ट्रातील 18-49 वयोगटातील 28.6 टक्के विवाहित महिलांनी पतीकडून होणाऱ्या हिंसेचा अनुभव घेतला आहे. आमच्या अभ्यासात एकूण महिलांपैकी ३५ टक्के महिलांनी त्यांना घरगुती हिंसाचाराचा अनुभव आल्याचे सांगितले. जिल्हावार ह्यामध्ये मोठे बदल दिसून आले. हे प्रमाण अकोल्यात ६० टक्के, परभणीत ५ टक्के, आणि यवतमाळमध्ये २५ टक्के एवढे होते. विधवा (४४ टक्के) आणि इतर एकट्या महिलांमध्ये (७९ टक्के) हे प्रमाण विवाहित महिलांपेक्षा (३२ टक्के) अधिक होते. त्याच्यापुढे जाऊन महिलांना होणाऱ्या वेगवेगळ्या हिंसाचाराचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**कोष्टक २३ – कौटुंबिक हिंसाचाराचे महिलांना येणारे अनुभव** (जिल्ह्यामध्ये टक्केवारी)

| हिंसाचाराचा अनुभव | अकोला | परभणी | यवतमाळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| पतीकडून शाब्दिक शिवीगाळ | 296 (88.9) | 11 (78.6) | 95 (75.4) | 402 (85.0) |
| पतीकडून मारहाण/ शारीरिक अत्याचार | 185 (55.6) | 11 (78.6) | 54 (42.9) | 250 (52.9) |
| कुटुंबातील सदस्यांकडून शाब्दिक शिवीगाळ | 185 (55.6) | 7 (50.0) | 54 (42.9) | 246 (52.0) |
| कुटुंबातील सदस्यांकडून मारहाण/ शारीरिक आत्याचार | 40 (12.0) | 3 (21.4) | 10 (7.9) | 53 (11.2) |
| आपले उत्पन्न देण्यास भाग पाडणे | 119 (35.7) | 2 (14.3) | 4 (3.2) | 125 (26.4) |
| कुटुंबाच्या उत्पन्नात वाटा दिला नाही | 24 (7.2) | 4 (28.6) | 13 (10.3) | 41 (8.7) |
| दारूच्या सेवनामुळे हिंसाचार वाढला | 111 (33.3) | 7 (50.0) | 54 (42.9) | 172 (36.4) |
| हुंड्यासाठी हिंसाचार | 6 (1.8) | 4 (28.6) | 4 (3.2) | 14 (3.0) |
| घटस्फोटाशिवाय पतीचे अनेक विवाह | 6 (1.8) | 1 (7.1) | 8 (6.3) | 15 (3.2) |
| कौटुंबिक मालमत्तेत हक्काचा वाटा नाकारणे | 26 (7.8) | 3 (21.4) | 11 (8.7) | 40 (8.5) |
| कौटुंबिक मालमत्तेमध्ये वाटा मागितल्याने छळ | 9 (2.7) | 2 (14.3) | 9 (7.1) | 20 (4.2) |
| कुटुंबाकडून दुसरं लग्न करण्यासाठी दबाव | 0 | 1 (7.1) | 2 (1.6) | 3 (0.6) |
| एकूण | 333 | 14 | 126 | 473 |

पतीकडून होणारी शाब्दिक हिंसा हा सर्वाधिक महिलांनी सांगितलेला अनुभव होता. त्यानंतर पतीकडून होणारी शारीरिक हिंसा आणि इतर कुटुंब सदस्यांकडून होणारी शाब्दिक  हिंसा अनुभवली असल्याचे सांगणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक होते. दारू पिऊन हिंसाचार वाढतो असे ३६ टक्के महिलांनी सांगितले तर त्यांचे उत्पन्न त्यांच्याकडून काढून घेतले जाते असे २६ टक्के महिलांनी सांगितले.

विवाहित महिलांमध्ये, पतीकडून होणारी शाब्दिक आणि शारीरिक हिंसा, दारू पिऊन मारहाण, आर्थिक हिंसा आणि त्यांच्या कामाची किंमत न ठेवणे याची अनेक उदाहरणे गटचर्चा आणि मुलाखतींमधून समोर आली.

यवतमाळमधील  वनिताने  सांगितले, “लग्नानंतर अनेक वर्षांनी  माझा नवरा दुसऱ्या बाईसाठी मला सोडून गेला. त्याने आमच्या जमिनीचा काही भाग विकला आणि पैसे घेऊन गेला. त्यानंतर मला फार मानसिक त्रास झाला. मी अजून डॉक्टरांकडे जाऊन उपचार घेत आहे” यवतमाळ येथील  कविता म्हणते “तो फार काही काम करत नाही. मी दिवसभर शेतात मेहनत करते, पण त्याला त्याची किंमत नाही. मी घरी आले की, त्याच्या मागण्या पूर्ण कराव्या लागतात. दिवसभर राबल्यावर रात्री साधंसुध  जेवण बनवलं तर तो शिव्या देतो आणि म्हणतो की सगळ्याच बाया  काम करतात तुझं काय एवढं कौतुक?”


यवतमाळामध्ये, मक्त्याने शेती करणाऱ्या महिलांच्या गटात चर्चा करताना त्यांनी सांगिले की शेतीमधील सर्व काम त्या सांभाळतात पण विक्रीला मात्र पुरुष जातात. माल विकून पैसे आले की ते त्यांच्या हातात येतात असे फक्त दोन महिलांनी सांगितले. बाकीच्या महिला म्हणाल्या की त्यांना त्यामधले काही मिळत नाही.

अशाप्रकारे होणारी हिंसा ही महिलांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करते आणि कुटुंबाच्या उपजीविकेवर परिणाम करू शकते. “त्याला दारूची गरज असते तेव्हा तो शेतातला माल नेऊन विकतो आणि त्या पैशाची दारू पितो” अकोल्यामधील शीला ने सांगितले. अनेक महिलांनी सांगितले की दारूच्या व्यसनामुळे पुरुष काम करत नाहीत, त्यांचे उत्पन्न दारूवर खर्च करतात किंवा महिलांच्या उत्पन्नातून पैसे मागतात. अकोल्यातील संगीता म्हणाली, “मी एक बकरी विकली, कर्ज घेतले आणि नवऱ्याला  पुनर्वसन केंद्रात पाठवले. तो आता मद्यपान करत नाही पण अजूनही माझ्याशी तसाच वागतो. शिव्या देतो आणि सारखी धमकी देतो की मी पुन्हा दारू प्यायला सुरूवात करेन.”

एकट्या महिलांना येणारे हिंसाचाराचे अनुभव वेगळ्या प्रकारचे असतात.  विशेषतः विधवा महिलांना  त्यांच्या सासरच्या कुटुंबाशी जमिनीच्या हक्कासाठी लढावे लागते. त्यांना जमीन देण्याची कुटुंबाची तयारी नसते किंवा जमीन मिळाली तरी शेती करण्यामध्ये अनेक अडचणी त्यांच्याकडून निर्माण केल्या जातात. अकोल्यातील अलकाने सांगितले, “माझा नवरा गेल्यापासनं, माझे दोन्ही दीर मला त्रास देत आहेत. माझी जमीन त्यांच्या जमिनीच्या मध्ये आहे आणि ते दोन्ही बाजूंनी हळूहळू जमीन कोरत आहेत. दरवर्षी ते त्यांचे तास वाढवतात.”

अकोल्यातील अलकाने सांगितले, “ माझा नवरा गेल्यापासनं, माझे दोन्ही दीर मला त्रास देत आहेत. माझे शेत त्यांच्या शेताच्या मध्ये आहे आणि ते दोन्ही बाजूंनी हळूहळू शेत कोरत आहे. दरवर्षी ते शेत करून त्यांचे तास वाढवतात”

सर्वेमध्ये हिंसाचार होतो असे म्हणणाऱ्या महिलांना त्यासाठी त्या कोणाकडे मदत मागतात का असे विचारले असता त्यापैकी ५६ टक्के महिलांनी होकारार्थी उत्तर दिले. ह्यामध्ये कोणाकडे मदत मागितली हे विचारले असता कुटुंबातील सदस्य (८४ टक्के), मैत्रिणी (३८ टक्के), गावातील लोक (१२ टक्के) हे पर्याय समोर आले. केवळ सहा टक्के (१६) महिला स्थानिक पोलीस ठाण्यात गेल्या. एकाही महिलेने जिल्हा पातळीवरील भरोसा सेल, किंवा स्पेशल सेल किंवा सखी सेंटर अशा संरचनांची मदत घेतली नाही किंवा हेल्पलाईनला फोन केला नाही. ह्यावरून सरकारी यंत्रणा महिलांपर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसते.





# भाग ५ : गोषवारा आणि पुढील दिशा

## अभ्यासातील निष्कर्षांचा सारांश

### प्रतीकुलतेचा संदर्भ

#### जात, वर्ग, लिंगभाव आणि भौगोलिक स्थानामुळे निर्माण होणाऱ्या असमानता

शेतीमधील बदलती परिस्थिती आणि त्याचे ग्रामीण महिलांवर होणारे परिणाम समजून घेत असताना आधी त्या महिलांच्या प्रतिकुलतेचा संदर्भ लक्षात घेणे महत्वाचे आहे, आणि तो ह्या अभ्यासातून प्रकर्षाने समोर येतो. ह्या महिलांमधील शिक्षणाचे प्रमाण, लग्नाचे वय, कुटुंबातील त्यांचे स्थान, हिंसाचाराचे अनुभव, वैवाहिक स्थितीवर अवलंबून असणारे समाजातील स्थान, साधनहीनता, आणि रोजगाराच्या मर्यादित संधी अशा मुळातच प्रतिकूल परिस्थितीतून येणाऱ्या ह्या महिला आहेत. त्याचबरोबर वंचित जातींमधील आणि भूमिहीन कुटुंबांतील महिलांच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अधिक भर पडते.

सर्वेमधील एकूण महिलांमध्ये ३४ टक्के महिला इतर मागासवर्गीय, २२ टक्के महिला अनुसूचित जातीच्या तर १४ टक्के महिला सर्वसाधारण जातीच्या होत्या. उरलेल्या ३० टक्क्यांमध्ये भटक्या आणि विमुक्त जाती, अनुसूचित जमाती आणि विशेष मागास वर्गातील महिलांचा समावेश होता. सर्वेमधील एकूण महिलांमध्ये विधवा महिलांचे प्रमाण १३.७ टक्के होते. एकूण महिलांपैकी २१ टक्के महिलांनी शालेय शिक्षण घेतलेले नव्हते, आणि शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये दहावीच्या पुढे

शिक्षण घेतलेल्या महिला कमी होत्या. शिक्षणाचे प्रमाण विशेष करून भूमिहीन मजुरी करणाऱ्या महिलांमध्ये, तसेच अनुसूचित जातीच्या महिलांमध्ये कमी होते. परभणी जिल्ह्यात शिक्षण आणि बालविवाहाच्या बाबतीत परिस्थिती अधिक वाईट होती. तेथे सध्या ३० वर्षांपर्यंत वय असणाऱ्या महिलांमध्ये देखील बालविवाहाचे प्रमाण ४९ टक्के होते. बचतगट वगळता इतर कोणत्याही गाव पातळीवरच्या संस्थांमध्ये सर्वेमधील महिलांचा समावेश नगण्य होता.

सर्वेमधील ५३ टक्के महिला भूमिहीन कुटुंबातील होत्या, आणि भूधारक कुटुंबांमध्ये छोट्या आणि सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण ८६ टक्के होते. भूधारक कुटुंबांपैकी ३६ टक्के कुटुंबांकडे सिंचनाची सोय होती, तर बाकीच्या कुटुंबांची पूर्ण शेती कोरडवाहू होती. सर्वेमधील भूधारक कुटुंबातील २४ टक्के महिलांच्या नावाने जमीन होती, आणि ह्यामध्ये विधवा महिलांच्या नावाने जमीन असण्याचे प्रमाण अधिक होते. ३३ टक्के महिलांकडे काही न काही गुरे होती. कुटुंबांमध्ये शेतीशी संबंधित साधने असण्याचे प्रमाण नगण्य होते.

ह्या महिलांना शेती आणि शेतमजुरी वगळता रोजगाराच्या इतर संधी काहीच उपलब्ध नव्हत्या. त्यातही भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण मोठे असल्याने केवळ मजुरीवर अवलंबून असणाऱ्या महिलांचे प्रमाण मोठे होते. भूधारक कुटुंबांमध्येही स्वतःच्या शेतीच्या बरोबरीने मजुरी करणे देखील अनेक महिलांना उपजीविकेसाठी गरजेचे होते. शेतीमधील बदललेली परिस्थिती आणि त्याचे महिलांवर होणारे परिणाम हे ह्या सर्व संदर्भाने समजून घ्यायला हवेत.

**शेतीचे मॉडेल आणि त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न**

सर्वे केलेल्या भागांमध्ये प्रामुख्याने सोयाबीन आणि कापूस ही दोन पीके घेतली जातात. मागील काही वर्षांमध्ये हळूहळू एकसुरी पीक पद्धती रूढ झाली आहे. त्याच बरोबर रसायनांचा वापर देखील शेतीमध्ये वाढला आहे. त्यामुळे बाजारावारचे अवलंबित्व वाढले आहे, आणि उत्पादनाचा खर्चही वाढला आहे. ह्याचा परिणाम मातीच्या गुणवत्तेवर तर झालाच आहे. पण त्याचबरोबर अन्न आणि पोषण सुरक्षेवर त्याचे गंभीर परिणाम झाले आहेत. अन्नधान्य आणि भाजीपाल्यासाठी बहुतेक महिला पूर्णपणे बाजारावर अवलंबून आहेत, आणि ते परवडत नसल्याने त्याचा परिणाम त्यांच्या आहारावर झालेला दिसतो. पूर्वी जेव्हा वेगवेगळी पीके पिकवली जायची त्यावेळी शेतकरी महिलांच्या बरोबरच मजुरी करणाऱ्या महिलांनादेखील धान्याच्या स्वरुपात मजुरी मिळत असे. ते प्रमाण आता कमी झाल्याने त्यांना बाजारातून विकत घेण्याशिवाय पर्याय रहात नाही. काही महिला धान्य मिळविण्यासाठी उक्त्याने जास्तीची कामे घेणे, किंवा शेतामधून उरलेले दाणे उचलणे अशा प्रकारची कष्टाची आणि वेळखाऊ कामे स्वीकारतात. जेणे करून त्यांच्या कुटुंबाची अन्नधान्याची गरज पूर्ण होऊ शकेल.

एकसुरी पीक पद्धतीचा परिणाम कामाच्या उपलब्धतेवर ही झाला आहे. सर्व शेतकरी एकच पीक घेत असल्याने ठराविक काळ काम उपलब्ध असते, त्यावेळी शेतकऱ्यांना मजुरांचा तुटवडा जाणवतो. पण वर्षातील मोठा काळ काम उपलब्ध नसते, त्यावेळी मजुरांची अडचण होते. ज्या काळात मजुरांची आवश्यकता आहे त्या काळात मजूर मिळणार नाहीत ह्या विचाराने शेतकरी मशीनने कामे करून घेणे, तणनाशके वापरणे असे पर्याय घेतात. तसेच हवामानातील बदल, पीक हातात येईल ह्याबद्दलची अशाश्वतता, बाजारामध्ये स्थिर नसणारे भाव, सिंचनाच्या सोयींचा अभाव, आणि जंगली जनावरांचा त्रास ह्यामुळे शेतकरी खर्च कमी करण्यासाठी अशा पर्यायांकडे वळतात. त्याचा परिणाम मजुरांना मिळणाऱ्या कामावर होतो. त्याचबरोबर शेतकरी कुटुंबातील महिलांवरील कामाचे ओझे वाढते.

**कमी झालेले काम आणि मजुरांचा तुटवडा ह्यामधील विरोधाभास**

ह्या सर्व परिस्थितीमध्ये मजुरीवर अवलंबून असणाऱ्या महिलांच्या रोजगारावर मोठा परिणाम झालेला दिसतो. अभ्यासात महिलांनी त्यांना सरासरी १२० ते १३४ दिवस काम उपलब्ध होत असल्याचे सांगितले. कामाचे कमी झालेले दिवस, आणि

मर्यादित उत्पन्न ह्यामुळे मजूर महिलांची आर्थिक ओढाताण होते. त्यांना सतत कामाच्या शोधात रहावे लागते, मिळेल ते काम करावे लागते. रोजच्या गरजांसाठीही पैसे नाहीत अशी वेळ अनेकदा येत असल्याने पैसे उधार घ्यावे लागतात. नंतर मजुरी करण्याच्या बोलीवर घेतलेले उधार पैसे फेडताना अनेकदा जास्तीचे काम करावे लागते. अशा प्रकारे मजुरांचे बांधले जाणे वाढताना दिसत आहे. काम कमी असते त्यावेळी काम मिळेल की नाही हे जातीवर देखील ठरते. शेतकरी स्वतःच्या जातीमधील महिलांना काम देण्यास प्राधान्य देतात, आणि वंचित जातींमधील महिलांच्या कामावर त्याचा परिणाम होतो. तसेच पारधी समाजासारख्या काही महिलांना ठराविक कामे नाकारली गेल्याने काम मिळविण्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो.

काही महिला गावात काम मिळत नसल्याने स्थलांतर करून जातात. स्थलांतर करून गेलेल्या ठिकाणी कमी मोबदल्यात अतिशय कष्टाची कामे त्या करतात. कोणत्याही सोयी सुविधा नाहीत, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता नाही अशा परिस्थितीमध्ये वर्षातील काही महिने त्यांना काढावे लागतात.

**आरोग्यावर होणारे परिणाम**

पुरेसे पोषण नाही, रासायनिक कीटकनाशके-तणनाशके ह्यांचा सततचा संपर्क आणि अतिशय कष्टाचे काम ह्या सर्व परिस्थितीचे महिलांच्या आरोग्यावरही अनेक परिणाम होताना दिसतात. पाठदुखी, कंबरदुखी, अंगदुखी, डोकेदुखी, त्वचेचे विकार अशा प्रकारच्या आरोग्याच्या समस्या अनेक महिलांनी सांगितल्या. त्याचबरोबर ह्या सर्व परिस्थितीमध्ये कुटुंब चालवण्याची जबाबदारी घेत असताना झोप न येणे, चिंता वाटणे आणि नैराश्य अशा समस्यांनी ग्रस्त असल्याचेही अनेक महिलांनी सांगितले.

**बाजाराशी संबंधित समस्या**

वर्षाच्या सुरूवातीला पुरेसे भांडवल नसल्याने बहुतेक शेतकरी महिलांना उधारीवर निविष्ठा घ्याव्या लागतात. त्या मुळात जास्त रकमेने घ्याव्या लागतात, पण त्याचबरोबर माल विकत असतानाही त्यामुळे अनेक बंधने येतात. त्याच व्यापाऱ्याला कमी किंमतीत माल विकावा लागतो. वेगवेगळ्या कारणांमुळे चांगला भाव मिळेपर्यंत थांबणे छोट्या शेतकऱ्यांना शक्य होत नाही, आणि तोटा सहन करून मालाची विक्री करावी लागते. महिला शेतकऱ्यांचा बाजाराशी येणारा संपर्क फार कमी आहे. खरेदी-विक्रीचे व्यवहार हे प्रामुख्याने पुरुषांकडून केले जात असल्याने त्याचा परिणाम महिलांना मिळणाऱ्या उत्पन्नावर होतो.

शेतीची कामे फार असतात त्या काळात मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांना मजुरांची कमतरता पडते. मजुरांना दिलेल्या उधार पैशांमुळे ह्या काळात मजूर उपलब्ध होतील ह्याची खात्री राहते. असाच मजुरांना बांधून ठेवण्याचा प्रकार ऊसतोडीसाठी जाणाऱ्या महिलांच्या संदर्भात दिसून येतो. ऊसतोडीच्या कामासाठी स्थलांतर करून जाणाऱ्या महिलांनी आधी उचल घेतलेली असते, जी अनेकदा त्या वर्षात काम करून फिटत नाही, आणि पुढच्या वर्षी त्यांना परत त्याच ठिकाणी कामाला जायला लागते.

**एकट्या महिलांना येणाऱ्या अडचणी**

एकट्या महिलांना शेती करत असताना विविध पातळ्यांवर हिंसाचाराचा सामना करावा लागतो. कुटुंबाकडून विरोध, पुरुष मजुरांचे असहकार्य, बाजारात जाता येत नाही, उधारीवर निविष्ठा घेण्यात येणाऱ्या अडचणी, आणि कायम असुरक्षिततेचे वातावरण ह्यामुळे त्या त्यांच्या पूर्ण क्षमतेनिशी फायद्याची शेती करू शकत नाहीत. अनेक एकट्या महिलांना त्यांची शेती मक्त्याने देणे भाग पडते. एकट्या महिला वंचित जातींमधील आणि भूमिहीन असतील तर त्यांच्या अडचणी आणखी वाढतात.

**कर्जाचे ओझे**

शेती आणि मजुरीमधील कामाची ही सर्व परिस्थिती असल्याने महिलांना मोठ्या प्रमाणात कर्जांवर अवलंबून रहावे लागते. महिलांच्या नावाने असणाऱ्या बँक खात्यांचे प्रमाण मोठे असले, तरी बँकेतून घेतलेल्या कर्जांचे प्रमाण मात्र त्याच्याशी सुसंगत नाही. शेतीशिवाय इतर सर्व कारणांसाठी महिला अनौपचारिक स्त्रोतांवर अवलंबून होत्या. शेती, मुलांचे शिक्षण, आरोग्य, ह्याच बरोबर रोजच्या खर्चासाठी घेतलेल्या कर्जांचे प्रमाणही अधिक होते. मायक्रोफायनान्स आणि सावकाराकडून घेतलेल्या कर्जाचा व्याजदर मोठा होता, आणि तो फेडण्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो असे दिसले. त्यासाठी सोने गहाण ठेवणे, शेळ्या विकणे, कमी भावाला माल विकणे असे पर्याय त्या निवडत असतात. वेळच्या वेळी कर्ज चुकवले गेले पाहिजे ह्यासाठीचा मानसिक ताणही मोठा असतो.

**सरकारचे अपयश**

अभ्यासातून ह्या महिलांना सामाजिक सुरक्षा तसेच इतर योजनांचा लाभ किती मर्यादित प्रमाणात मिळतो आहे हे स्पष्ट दिसून येते. रेशनमधून केवळ गहू आणि तांदूळ एवढ्याच गोष्टी पुरविल्या जातात, आणि सरकारच्या सततच्या बदलत्या धोरणांमुळे तेही अनेक महिलांना सध्या मिळत नाही. पेन्शन, मातृत्व वंदन अशा महिलांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ फार कमी महिलांना मिळाला होता. शेतीशी संबंधित पी एम किसान, पीक विमा ह्या योजनांचा लाभ मिळालेल्या महिलांचे प्रमाण कमी होते. तसेच महिलांना कामाची एवढी गरज असतानाही रोजगार हमी योजनेमधून फार मोजक्या महिलांना काम मिळाल्याचे दिसले. कुटुंबातील सर्व कामाची जबाबदारी महिला उचलतात आणि त्यामध्ये पाण्याच्या सुविधांसारख्या मुलभूत सुविधा उपलब्ध नसतील तर महिलांचे हे कष्ट आणखी वाढतात. आरोग्य सुविधांचा अभाव देखील अभ्यासामधून स्पष्ट दिसून आला. बहुतेक महिला आजारपणात खर्चिक असले तरीही खाजगी रुग्णालयांमध्येच जात होत्या. कामाची अनुपलब्धता, आर्थिक ओढाताण आणि कर्जाचे ओझे ह्या सगळ्याशी झगडत असताना पुरेशी सामाजिक सुरक्षा सरकारकडून न मिळाल्याने त्यांचा संघर्ष अधिकच वाढतो.

**आयुष्याचे वेगवेगळे भाग व्यापणारा हिंसाचार**

शेतकरी महिलांना येणारे हिंसाचाराचे वेगवेगळे अनुभव अभ्यासातून समोर आले. मजुरीच्या ठिकाणी होणारा अन्याय, जातीमुळे केला जाणारा अन्याय, कुटुंबात होणारा हिंसाचार, बाजारात व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक, सरकारी कार्यालयांमध्ये मिळणारी वागणूक, कर्जवसुलीसाठी येणाऱ्या लोकांचा त्रास अशा अनेक प्रकारे तो अभ्यासातून समोर आला. शेती क्षेत्रामध्ये गुंतलेल्या महिलांसाठी घरगुती आणि कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार ह्यामधील सीमारेषा पुसट असतात हे ही अभ्यासातून समोर आले. कुटुंबातील लोकांनी संपत्तीवरचा अधिकार न देणे, नवऱ्याने दारूच्या व्यसनासाठी शेतामधील माल विकून टाकणे, स्थलांतर करून गेलेल्या ठिकाणी वाढलेली मारहाण, स्वतःच्या शेतात बोलावलेल्या पुरुष मजुरांकडून होणारी अरेरावी अशी कितीतरी उदाहरणे महिलांनी सांगितली. शेतीच्या संदर्भात कामाचे ठिकाण कोणते ह्याबाबत स्पष्टता नसल्याने त्यादृष्टीने फारशी चर्चा झालेली नाही. हिंसाचाराच्या विरोधात काम करणारी मोठी संरचना असली तरी महिलांनी त्यापर्यंत पोहोचण्याचे प्रमाण फार कमी आहे हे अभ्यासातून स्पष्ट दिसले.

## पुढील दिशा

अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष पाहता महिला शेतकऱ्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### महिलाकेंद्रित धोरणे आणि शेती क्षेत्रामधील गुंतवणूक

सध्याच्या कृषी गुंतवणुकीच्या मॉडेलमध्ये थेट रोख रक्कम देणे आणि निविष्ठांसाठी सबसिडी देणे ह्यावर भर दिलेला आहे. त्याऐवजी शेतकऱ्यांची संसाधने वाढवायला मदत करेल, बियाणे-खतांच्या कंपन्यांना नाही तर शेतकऱ्यांना प्राधान्य देईल, आणि केवळ सिंचित प्रदेशांना नाही तर कोरडवाहू प्रदेश, तेथील पीके आणि तेथील शेतकरी ह्यांनाही प्राधान्य देईल असे धोरण आखण्याची गरज आहे.

संरचनात्मक परिवर्तनास प्रोत्साहन देणाऱ्या धोरणाकडे वळण्याची गरज आहे. या सुधारणांसाठी प्रथम जमिनीचे पुनर्वसन, जमीन आणि इतर संसाधनांचे समान वाटप करणे तसेच पर्यावरणपूरक कृषी मॉडेल्ससाठी जमीन आणि पाण्याचे पुनर्वाटप करणे गरजेचे आहे. वारसा आणि जमिनींचे वितरण ह्या दोन्ही माध्यमांतून महिलांच्या जमिनीच्या हक्कांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच केवळ मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्ये गुंतवणूक न करता स्थानिक जलसंवर्धन आणि जलधारणेच्या सुधारणा करण्यासाठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. छोट्या शेतकऱ्यांना कमी किंमतीत माल विकायला लागू नये ह्यासाठी स्थानिक बाजारपेठेची निर्मिती; शेतीमाल साठवण्यासाठी गावस्तरावर साठवणुकीची जागा निर्माण करणे गरजेचे आहे. कोरडवाहू आणि दुष्काळप्रवण भागातील महिलांसाठी कमी व्याजाने संस्थात्मक कर्ज देण्याची सुविधा करावी. त्याचा फायदा शेती कसणाऱ्या, शेतमजूर, मक्त्याने शेती करणाऱ्या, पशुपालक अशा सर्व महिलांना मिळायला हवा. शेतीशी संबंधित योजनांचे फायदे हे जमिनीच्या मालकीवर नाही तर शेतीमध्ये केल्या जाणाऱ्या कामावर अवलंबून असावेत. त्यामुळे महिला शेतकऱ्यांना शेतकरी म्हणून ओळख मिळू शकेल. महिलांचा रोजगार काढून घेणार नाहीत पण त्यांचे कष्ट कमी करतील अशा यंत्रांच्या निर्मितीमध्ये गुंतवणूक करावी. गटाने शेती किंवा मजुरी करणाऱ्या महिलांना सहाय्य करावे.

### सामाजिक सुरक्षा

कुटुंबातील मुले, वयस्कर लोक, आजारी लोक ह्यांची काळजी घेणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्या कामाचे महिलांवर असणारे ओझे कमी होईल.

विविध पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देईल अशी विकेंद्रित रेशन व्यवस्था उभी करायला हवी ज्याद्वारे वेगवेगळ्या पोषक आहाराचे वितरण करता येईल.

### स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवणे

शेतीची कामे कमी असतात त्या कालावधीत महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. काम नसण्याचे हंगाम विविध कारणांनी वाढत आहेत. ह्याकाळासाठी सामाजिक संरक्षणाचे साधन म्हणून रोजगार हमी सारख्या उपक्रमांकडे पहावे. शेती मधील संकटामुळे महिलांवरचा भार वाढला आहे. पुरुष आणि कधी-कधी संपूर्ण कुटुंबाला कामाच्या शोधात स्थलांतर करण्यास भाग पडते आहे. महिलांना कुटुंबाच्या जगण्याकरिता सतत कोणत्यातरी कामाचा शोध घ्यावा लागतो. किंवा जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी वाढवणे आवश्यक आहे, ज्यामुळे कृषीमधील मालमत्तेच्या निर्मितीस प्रोत्साहन मिळेल. मनरेगा हा महिलांना रोजगार पुरविण्यासाठी, तसेच दुष्काळाचा सामना करणे,

माती आणि पाण्याचे संवर्धन सुधारण्यासाठी चांगला पर्याय आहे. अशा कार्यक्रमासाठी गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे. त्याशिवाय बिगरकृषी क्षेत्रात रोजगार वाढवण्यासाठी गुंतवणूक करणे देखील महत्त्वाचे आहे. भूमिहीन महिलांसाठी, ज्यांच्यातील बहुसंख्य महिला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती मधील आहेत त्यांना पर्यावरणपूरक शेतीमध्ये योगदान देतील अशा सेवासुविधा पुरविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

### निर्णयप्रक्रियेतील महिलांचा सहभाग

महिलांचा शासनाच्या सर्व स्तरांवर सहभाग असेल ह्याची खात्री करणे आवश्यक आहे. महिलांना असणारी अधिक असुरक्षितता आणि त्यांच्यावरील कामाचे ओझे विचारात घेता नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनातील स्थानिक आणि राष्ट्रीय उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढवणे महत्वाचे आहे.

### महिलांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहाय्य

महिला शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहेच. पण त्याचबरोबर महिलांच्या अधिकारांसाठी काम करणाऱ्या संस्था, महिला-केंद्रित धोरणे करणाऱ्या संस्था, स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने आणि शेतकरी महिलांसाठी काम करणाऱ्या संघटना ह्यांना बळकट करणे आणि त्यांच्यामध्ये गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

### संरचनात्मक असमानतांचे निवारण आणि सुरक्षित कामाची ठिकाणे

जात, पितृसत्ता आणि इतर सामाजिक विषमता महिला शेतकऱ्यांच्या हक्कांच्या प्रगतीत मोठा अडथळा निर्माण करतात. स्थानिक स्तरावर जात, वर्ग, वैवाहिक स्थिती, इत्यादींनी महिलांच्या कामगार, शेतकरी म्हणून संधींना अडथळा निर्माण होतो, आणि त्या पूर्ण क्षमतेने काम करू शकत नाहीत. त्यामुळे जात, वर्ग, आणि पितृसत्ताक आधारित विषमतेविरोधात जागरूकता वाढवण्यासाठी उपक्रम सुरू करणे आणि महिलांना भेदभावाशी लढण्यासाठी सहाय्य करतील अशी संसाधन केंद्रे गावपातळीवर स्थापन करणे आवश्यक आहे. यामुळे महिलांसाठी सुरक्षित आणि अनुकूल कामाची ठिकाणे निर्माण होण्यास मदत होईल.

### घरगुती आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचाराचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना

महिला जेथे काम काम करतात ते त्यांचे स्वतःचे शेत, किंवा ज्याठिकाणी मजुरीला जातात ते शेत हे कामाचे ठिकाण म्हणून ओळखले जात नाही. ही कामाची ठिकाणे कार्यस्थळ आहेत की नाहीत ह्याबाबतच्या अस्पष्टतेमुळे महिला शेतकऱ्यांना सध्या अस्तित्त्वात असणाऱ्या कायद्यांतर्गत न्याय मागण्याची संधी मिळत नाही. सखी केंद्रे, विशेष कक्ष, आणि भरोसा कक्ष यांसारख्या संरचनांमध्ये महिलांना सहज जाता यावे ह्यादृष्टीने प्रयत्न करावेत. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचाराबद्दल त्यांना माहिती देऊन घरगुती हिंसाचार हा अनेकदा कामाच्या ठिकाणीही विस्तारत असतो ह्या बाबत त्यांच्यात जागरूकता निर्माण करावी. आणि त्याचमुळे तक्रार निवारण व्यवस्था ह्या अधिक समावेशक असाव्यात.

'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ )प्रतिबंध ,निषेध आणि निवारण( कायदा ,२०१३' ह्या कायद्याबद्दल महिलांना फारशी माहिती नाही. तसेच कामाचे ठिकाण कोणते आणि त्यांना कर्मचारी म्हणून अधिकार मिळू शकेल का ह्याबद्दल त्यांना स्पष्टता नाही. कायद्याबद्दलची माहिती आणि जागरूकता वाढवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी महिलांना सहजपणे समजण्याजोगी माहिती आणि साहित्य पुरविण्यात यावे. महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराच्या विरोधात काम करणारी जी संपूर्ण यंत्रणा आहे तिची क्षमता बांधणी होऊन ती मजबूत होणे गरजेचे आहे. यामध्ये अंगणवाडी कार्यकर्त्या, आशा कार्यकर्त्या, पोलिस पाटील, स्थानिक तक्रार समित्या (LCC) इत्यादींचा समावेश आहे.

जिल्हा स्तरावरील स्थानिक तक्रार समितीची माहिती सर्व ग्रामपंचायत कार्यालये, रोजगार हमीच्या कामाची ठिकाणे येथे प्रदर्शित केली जावी. तसेच ग्रामसभेच्या पातळीवर स्थानिक तक्रार समित्या स्थापन कराव्यात जेणेकरून त्याठिकाणी जाणे महिलांना सोपे होईल.

कौटुंबिक आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचाराला ग्रामीण भागाच्या संदर्भात वेगवेगळे न पाहता तो परस्परांशी संबंधित व्यापक स्वरूपाचा आहे असे त्याकडे पहिले गेले पाहिजे. त्याच दृष्टीने दोन्ही प्रकारच्या हिंसेचा सामना करेल आणि सर्वच क्षेत्रात सन्मान आणि समानतेची संस्कृती निर्माण करेल अशी व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे.

# कोष्टक आणि तक्त्यांची यादी


| | |
|---|---|
| कोष्टक १ | **अभ्यासात वापरलेल्या विविध पद्धती** |
| कोष्टक २ | **अभ्यास केलेल्या जिल्ह्यांची थोडक्यात आकडेवारी** |
| कोष्टक ३ | **सर्वे मधील सहभागी महिलांची जातवार विभागणी**<br>(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी) |
| कोष्टक ४ | **सर्वे मधील सहभागी महिलांची वयोगटाप्रमाणे विभागणी**<br>(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी) |
| कोष्टक ५ | **सर्वे मधील सहभागी महिलांची वैवाहिक स्थितीप्रमाणे विभागणी**<br>(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी) |
| कोष्टक ६ | **सर्वे मधील सहभागी महिलांचे लग्नाच्या वेळी वय**<br>(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी) |
| कोष्टक ७ | **सर्वे मधील सहभागी महिलांची शिक्षणाप्रमाणे विभागणी**<br>(जिल्ह्यातील एकूण कुटुंब संख्येशी टक्केवारी) |
| कोष्टक ८ | **सहभागी महिलांच्या कुटुंबांमधील जमिनीची मालकी**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक ९ | **सर्वे मधील सहभागी भूधारक कुटुंबांची भूधारणा**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक १० | **भूधारक कुटुंबांकडे असणाऱ्या सिंचनाच्या सोयी**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक ११ | **भूधारक कुटुंबातील महिलांची जमिनीवरील मालकी**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक १२ | **महिलांच्या नावाने बँक खाते**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक १३ | **सर्वेमधील महिलांना मिळणारा सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक १४ | **सर्वे मधील महिलांचे उपजीविकेचे पर्याय**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक १५ | **उपजीविकेसाठी करत असलेल्या कामाप्रमाणे महिलांची विभागणी**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |

| | |
|---|---|
| कोष्टक १६ | **कुटुंबाच्या जमिनीच्या मालकीप्रमाणे वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला**<br>(जमिनीच्या मालकीमध्ये टक्केवारी) |
| कोष्टक १७ | **भूधारक कुटुंबांच्या भूधारणेप्रमाणे वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला**<br>(भूधारणा वर्गामध्ये टक्केवारी) |
| कोष्टक १८ | **जातीप्रमाणे वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला**<br>(जातीमध्ये टक्केवारी) |
| कोष्टक १९ | **सर्वे मधील शेती कसणाऱ्या महिलांनी २०२२-२३ मध्ये घेतलेली पीके**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक २० | **सध्या घेतलेल्या कर्जांचे उद्देश**<br>(जिल्ह्यामधील टक्केवारी) |
| कोष्टक २१ | **आरोग्याविषयीच्या समस्या**<br>(समस्या आहे असे सांगणाऱ्या महिलांची जिल्ह्यामध्ये टक्केवारी) |
| कोष्टक २२ | **मानसिक आरोग्याविषयीच्या समस्या**<br>(समस्या आहे असे सांगणाऱ्या महिलांची जिल्ह्यामध्ये टक्केवारी) |
| कोष्टक २३ | **कौटुंबिक हिंसाचाराचे महिलांना येणारे अनुभव**<br>(जिल्ह्यामध्ये टक्केवारी) |
| तक्ता १ | **सर्वेमधील महिलांचा आहार,** टक्केवारी |
| तक्ता २ | **अन्नपदार्थ मिळविण्याचे स्त्रोत,** टक्केवारी |